# प्रकरण दुसरे

## लक्ष्मीनारायण बोल्ली : व्यक्ती आणि व्यक्तिमत्त्व

समाजामध्ये जीवन जगत असताना आपल्या संपर्कात अनेक व्यक्ती येत असतात. यातील प्रत्येक व्यक्ती आचार, विचार आणि कर्तृत्वाने इतरांपेक्षा वेगळी असते. व्यक्ती ज्या सामाजिक वातावरणात जगत असते त्या वातावरणाचा परिणाम त्याच्या जडण-घडणीवर होत असतो. तसेच व्यक्ती ज्या क्षेत्रात किंवा ज्या क्षेत्रातील व्यक्तींच्या सहवासामध्ये जास्त काळ असते त्याचा प्रभाव त्या व्यक्तीवर पडत असतो. जीवनामध्ये व्यक्तीला अनेक बरे-वाईट अनुभव येतात. या अनुभवांचादेखील परिणाम व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वावर होत असतो. या कारणांमुळेच प्रत्येक व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व भिन्न-भिन्न असल्याचे जाणवते. प्रत्येक व्यक्तीची समाजातील ओळख ही त्याच्या व्यक्तिमत्त्वावरच अवलंबून असते. प्रस्तुत प्रकरणात लक्ष्मीनारायण बोल्ली व्यक्ती म्हणून कसे होते आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडण-घडण कशाप्रकारे झाली याचा आढवा घ्यावयाचा आहे.

लक्ष्मीनारायण बोल्ली : व्यक्ती

लक्ष्मीनारायण बोल्ली यांचे आजोबा नरसय्या बोल्ली हे तेलंगणातील गुंडाराम या छोट्याशा खेड्यातून जमीनदाराच्या अन्यायाला कंटाळून सोलापूरला आले. सोलापूरमध्ये लुगडी विणण्याच्या कामावर ते रूजू झाले. लुगडी विणता-विणता नरसय्या बोल्ली सोलापूर शहरामध्ये स्थायिक झाले. नरसय्यांचे जेष्ठ सुपूत्र इरय्या बोल्ली समाजकार्य करून सोलापूरचे पहिले महापौर झाले. अशा इरय्या बोल्लींना १५ एप्रिल १९४४ रोजी मुलगा झाला त्याचे नाव लक्ष्मीनारायण ठेवण्यात आले.

लक्ष्मीनारायण बोल्ली यांच्या घराच्या पाठीमागे एक पाळणाघर होते. लक्ष्मीनारायण आणि त्यांचे चुलते दशरथ जे त्यांच्यापेक्षा सहा महिन्यांनी मोठे होते. हे दोघे

BARR. BALASAHEB KHARDEK[illegible] LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

पाळणाघरात जाऊ लागले. दशरथ दिसायला देखणा आणि सदृढ होता. तर लक्ष्मीनारायण रंगाने सावळे, अंगाने कृश, कुरळे केस अशा रूपाचे होते. या त्यांच्या कुरूपपणामुळे पाळणाघरामध्ये त्यांना दशरथपेक्षा वेगळी वागणूक मिळायची, दशरथला गादीवर तर लक्ष्मीनारायण यांना फरशीवर ठेवले जायचे. दशरथला दगटी पाटी, बारीक पेन्सील तर बोल्लींना काळ्या रंगाचा छोटा फळा व बोटात न मावणारा खडू दिला जायचा. दशरथला शुद्ध दूध तर बोल्लींना पावडरचं दूध दिलं जायचं त्या गोष्टी बोल्लींच्या लक्षात आल्या. याबाबत त्यांनी त्यांच्या आईला विचारले असता आई म्हणाली,'' दशरथ तुझ्याहून मोठे आहेत.'' [१] या उत्तराने लक्ष्मीनारायण यांना आपल्या दुय्यम अस्तित्त्वाची जाणीव झाली. लहानपणापासूनच बोल्लींना घरातील सर्वजण झिडकारायचे. याबाबत लक्ष्मीनारायण म्हणतात की, '' बावळट, काळा, काहीसा नकटा, एक आई सोडून सारे मला हिडीसफिडीस करीत माझ्याशी वागायचे. याचीसुद्धा मला हळूहळू सवय झाली. किंबहुना तशी मला सवय करून घ्यावीच लागली.'' [२]

लक्ष्मीनारायणचं शाळेत जायचं वय झालं. लक्ष्मीनारायण कुंचेकोरवी शाळेत जाऊ लागले. शाळेच्या पहिल्याच दिवशी लक्ष्मीनारायण वर्गशिक्षक वर्गाबाहेर गेल्याचे पाहून घरी पळून आले. कुंचेकोरवी शाळा सरकारी असल्याने मुलांना हजेरीबाबत कोणीही विचारत नसे. त्यामुळे विद्यार्थी शाळेला कधीही यायचे आणि कधीही जायचे. लक्ष्मीनारायण बोल्लीही आपल्या मर्जीनुसार शाळेला जात होते.

लक्ष्मीनारायण शाळेत असताना अतिशय सामान्य बुद्धीचे होते. सर्व विषयात अगदी जेमतेम गुण त्यांना मिळायचे. तिसरीमध्ये दशरथ आणि लक्ष्मीनारयणांना सर्व विषयात कमी गुण मिळाले.गुणपत्रक पाहून त्यांच्या काकांनी आणि वडिलांनी दशरथ आणि लक्ष्मीनारायण या दोघांना बेदम मार दिला. दोघांची प्रगती व्हावी म्हणून त्यांना चौथीला विजापुरे शाळेत घालण्यात आले. विजापुरे शाळेतील चौधरी मास्तर छडी तुटेपर्यंत विद्यार्थ्यांना मारायचे. मार खाऊन दोघांची अभ्यासात प्रगती होईल म्हणून इरय्या बोल्लींना

त्यांना चौधरी मास्तरांकडे शिकवणीला घातले तेंव्हा चौधरी मास्तर इरय्या बोल्लींना म्हणाले,'' बारा-बारा तास माझ्या ताब्यात राहिले आणि छडीच्या प्रसादाचा आस्वाद घेतला की ही पोरं एका वर्षात सुधारतील अन्यथा नाही. यात दशरथ बुद्धीने तेज आहे पण हा काळ्या मात्र मंद बुद्धीचा आहे.'' [३] चौधरी मास्तरांनी बोल्लींना मंद बुद्धीचा म्हणून जाहीर केले. पण बोल्लींना मंद बुद्धीचा म्हणजे काय? हेच माहित नव्हते. लक्ष्मीनारायण आणि दशरथ पहाटे घरातून बाहेर पडले की रात्रीच घरी पोहचायचे. चौधरी मास्तरांकडे एक वर्ष शिक्षा भोगून चौथी पास झाले. पाचवीला ते दोघे गाढवे मास्तरांच्या वर्गात गेले. गाढवे मास्तर अत्यंत चिडखोर स्वभावाचे होते. चिडल्यानंतर मार द्यायचे आणि मुलांच्या पाठीवर बसायचे. लक्ष्मीनारायण यांनी केलेल्या चुकीबद्दल एकदा त्यांच्या पाठीवर बसले ही गोष्ट बोल्लींनी वडीलांना आणि काकांना सांगितली. दुसऱ्या दिवशी काका आणि वडिलांनी हेडमास्तरांशी भांडण केले. गाढवे सरांना चांगलेच खडसावले आणि भांडणानंतर लक्ष्मीनारायण आणि दशरथचे शिक्षण बंद करण्याचा निर्णय घेतला. लक्ष्मीनारायणना सहा महिन्याचे व्यापारी शिक्षण द्यायचे आणि दशरथला त्यांच्याच बुधवार बाजारातील पाजणीच्या दुकानात नोकर म्हणून ठेवायचे ठरले. सहा महिन्याच्या व्यापारी शिक्षणानंतर लक्ष्मीनारायण अंबिका डाईंगमध्ये काम करू लागले. वयाच्या दहाव्या वर्षी ते रंगवलेल्या दहा-दहा पेट्या खांद्यावर घेऊन खातेदारांच्या दुकानांवर जाऊ लागले. सकाळपासून संध्याकाळपर्यंत ते राबायचे. स्वतःच्या या अवस्थेबद्दल ते म्हणतात,'' शिकण्याच्या, खेळण्याच्या वयात मी घाण्याला जुंपला गेलो होतो.'' [४]

अचानक एके दिवशी आंबादास काकांच्या मनात काय आले कोणास ठाऊक त्यांनी दशरथ आणि लक्ष्मीनारायण या दोघांची नावं कुंचन हायस्कूलमध्ये घातली. लक्ष्मीनारायणचे शिक्षण पुन्हा सुरू झाले. लक्ष्मीनारायण हे शालेय वयात अत्यंत नकारात्मक विचारांचे होते. कोणतीही गोष्ट आपल्या आवाक्यातील नाही, आपल्याला ती जमणार नाही म्हणून स्वतःला त्यापासून दूर ठेवायचे. सहावीच्या वर्गात एकदा कुलकर्णी

सरांनी बालकवींची 'श्रावणमासी' ही कविता पाठ करण्यास सांगितले होते सर्व मुलांनी कविता पाठ केली आणि वर्गात म्हणून दाखविली. बोल्लींनी आपल्याला कविता पाठ होणार नाही म्हणून पाठ केली नाही. सरांनी वर्गामध्ये बोल्लींचा अपमान केला आणि दुसऱ्या दिवशी कविता पाठ न करता आल्यास मार देण्याची धमकी दिली. बोल्लींनी माराच्या भितीने आपल्या आजोळी राहून चार-पाच तास सराव करून कविता पाठ केली आणि वर्गात म्हणून दाखविली.

लक्ष्मीनारायण बोल्ली जसे नकारात्मक विचारांचे होते तसेच ते अत्यंत भित्र्या स्वभावाचे होते. सोलापूर रोटरी क्लबने आयोजित केलेल्या १४ वर्षाखालील चित्रकला स्पर्धेमध्ये लक्ष्मीनारायणना दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस मिळाले. सोलापूर समाचारमध्ये तशी बातमी छापून आली. शाळेमध्ये फलकावर बोल्लीचे नाव लिहून अभिनंदन केले गेले. बक्षीस वितरणाच्या दिवशी राज्यपालांच्या हस्ते त्यांना बक्षीस स्वीकारल्यानंतर काय करायचं याबाबतच्या सर्व सूचना दिल्या. बक्षीस समारंभाचा दिवस उजाडला. बोल्लींनी म्हसवडकर सरांनी सांगितल्याप्रमाणे स्वच्छ पोशाख करून कार्यक्रमाच्या अगोदर अर्धातास हॉलशेजारी आले. हॉलमध्ये कोणीही नव्हते. म्हणून ते कट्ट्यावर बसले. थोड्याच वेळात बसल्या ठिकाणी त्यांना झोप लागली. ज्यावेळी त्यांना जाग आली त्यावेळी ते हॉलकडे धावले. एवढ्यात चित्रकलेल्या बक्षीसासाठी लक्ष्मीनारायण बोल्ली यांचे नाव पुकारण्यात आले. बोल्ली नुकतेच झोपेतून जागे झालेले. त्यामुळे भांबावलेल्या अवस्थेतच ते स्टेजवर गेले. स्टेजवर राज्यपालांच्या दोन्ही बाजूला तलवारधारी अंगरक्षक उभे होते. या अंगरक्षकांना त्यांनी पाहिले आणि भितीने बक्षीस न घेता पळत सुटले ते घराजवळ होऊनच थांबले. दुसऱ्या दिवशी लक्ष्मीनारायण वर्गात गेले तेंव्हा सर्व मुले त्यांची टिंगल करू लागली " शेवटी तेलंगणी विणकरच वेडपट"[५] म्हसवडकर सरांनीही त्यांना नेभळट, मूर्ख म्हणून हिणवले. तेंव्हा लक्ष्मीनारायण रडत रडत म्हणाले " सर मी जन्मात कधी सभा पाहिली नाही. सर मला भिती वाटली होती."[६]

लक्ष्मीनारायण ज्या रस्त्याने शाळेला जायचे त्या रस्त्यावर शेळ्या राखण्यासाठी एक मुलगी यायची. मुले तीला वेडी चांदी म्हणत असत. ती मुलगी लक्ष्मीनारायणांकडे पाहून हिरॉईनसारखी हातवारे करीत गाणे म्हणायची " जियाओ, जियाओ जिया कुछ बोलदो..." [७] चार सहा दिवस असे रोजच होऊ लागले. तेंव्हा लक्ष्मीनारायणांनी त्या मुलीला घाबरून शाळेला जाण्याचा रस्ताच बदलला.

१९६२ ला बोल्लींनी दयानंद महाविद्यालयात प्रवेश घेतला. याच दरम्यान शिवाजी विद्यापीठाने आयोजित केलेल्या 'लोकमान्य टिळक' विषयावरील निबंध स्पर्धेची नोटीस आली. १५ जुलैपर्यंत निबंध लिहून प्रा. वि.म.कुलकर्णींकडे दयावयाचे होते. दहा-बारा दिवस टिळकांचे साहित्य वाचून बोल्लींनी निबंध तयार केला. सर्वात अगोदर बोल्लींचा निबंध तयार झाला होता. पण एवढ्या लवकर कशाला दयायचा म्हणून त्यांनी तो दिला नाही. दररोज निबंध सरांना द्यायचा म्हणून सरांच्याजवळ ते जायचे पण घाबरून निबंध न देताच घर गाठायचे. शेवटच्या दिवशी लक्ष्मीनारायणनिबंध द्यायचाच म्हणून मनाची तयारी करून सरांच्या पाठीमागून जाऊ लागले. शेवटी निबंध द्यायचं धाडस काही झालं नाही. बोल्ली मागे वळले.महाविद्यालयीन जीवनापर्यंत लक्ष्मीनारायण बोल्ली यांचा भित्रेपणा काही कमी झाला नाही.

लक्ष्मीनारायण बोल्ली हे एकलकोंडे, बावळट, भित्रे संकोची वृत्तीचे होते. पण खोडकरपणाही त्यांच्यामध्ये लपलेला होता. भित्रेपणामुळे तो खोडकरपणा कधी बाहेर पडत नव्हता. जीवनात एकदाच त्यांनी खोडकरपणा केला. बोल्ली नॉर्थकोट शाळेत असताना वर्गातील पहिल्या डेस्कवर मच्छा नावाचा मुलगा बसायचा. एक दिवशी ती जागा रिकामी दिसताच लक्ष्मीनारायण त्या जागी बसले. एवढ्यात मच्छा आला आणि म्हणाला," मी इथं माझी वही ठेवली असताना तू का बसलास?" [८] एवढे ऐकूण बोल्ली उठले आणि मागे जाऊन बसले. उठता उठता त्यांनी मच्छाची वही घेतली होती. बोल्लींनी वहीच्या पहिल्या पानावर ४२० असं लिहिले आणि हळूच त्याची वही त्याच्या डेस्कमध्ये

ठेवली. मच्छानं वही उघडून पाहताच तो खवळला आणि पेंडसे सरांना बोल्लींचं नाव सांगण्यासाठी गेला. तेवढ्यात बोल्लींनी " इंग्रजी ४ ला मराठीतलं 'म'केलं. पुढच्या २ ला 'च' च अर्धअक्षर करून ० ला 'छ' चं वर्तुळ जोडलं. त्याच्या पुढं मात्रा ओढून चक्क ४२० ला 'मच्छा' केलं." [१] सरांनी वर्गात येऊन मच्छाची वही तपासली. वहीमध्ये कोठेचं ४२० लिहिलेलं दिसेना. तेंव्हा सरांनी मच्छालाच मार दिला. लक्ष्मीनारायण बोल्ली छंदी होते. एखाद्या गोष्टीचा त्यांना छंद जडला की दिवस-रात्र त्याच गोष्टीत ते रमून जात असतं. भानू नावाच्या एका मुलाला त्यांनी एकदा बासरी वाजवताना पाहिले. तेंव्हापासून त्यांना बासरीचा छंद जडला. दुसऱ्या दिवशी बाजारात जाऊन बासरी आणली आणि भानूकडे शिकण्यास गेले. भानूने त्यांना बासरी वाजवण्यास शिकवले. लक्ष्मीनारायण दिवसभर घरात बासरी फुकू लागले. शाळेला जातानाही ते दप्तरातून बासरी घेऊन जाऊ लागले. लहान सुट्टी, मधली सुट्टी झाली तरी जेवण्याऐवजी बासरी फुकत बसू लागले. बोल्लींचा बासरी वाजवण्याचा छंद पाहून एका व्यक्तीने त्यांना दिंगबरबुवा कुलकर्णींकडे बासरी शिकण्यास सांगितले. तेंव्हा बोल्ली कुलकर्णींकडे गेले. कुलकर्णींनी बासरी शिकविण्यासाठी दरमहा दहा रूपये फीची मागणी केली. बोल्लींच्या वडीलांनी मात्र त्यांना पैसे दिले नाहीत. बोल्लींचा बासरी वाजवण्याचा छंद इथेच थांबला.

लहानपणापासूनच बोल्लींना चित्रकलेची आवड होती. अगदी मॅट्रिक नापास होईपर्यंत त्यांनी हा छंद जोपासला. बोल्ली मॅट्रिकमध्ये नापास झाले. दशरथकाका आणि इतर मित्र कॉलेजला जाऊ लागले. लक्ष्मीनारायण मॅट्रिकमध्ये नापास असतानादेखील त्यांची चित्रकलेची आवड पाहून म्हसवडकर सरांनी मुंबईच्या जे.जे. स्कूल ऑफ आर्टस् या कॉलेजमध्ये त्यांचा प्रवेश अर्ज भरला. म्हसवडकर सर मुंबईला जाण्यासाठी बोल्लींच्या घरी आले. बोल्लीच्या वडीलांना जे.जे. स्कूल ऑफ आर्टस्मध्ये चित्रकला शिकवतात हे माहित नव्हते. सरांनी ज्यावेळी सांगितले ते त्यावेळी भडकले. सरांसमोरच लक्ष्मीनारायणचे चित्रकलेचे साहित्य गटारामध्ये फेकून दिले. कारण त्यांचा समज होता की चित्रकार म्हणजे

पेंटर, दारूडे, विड्या ओढणारे, व्यसन करणारे असतात. तेंव्हा बोल्ली म्हणतात,"आयुष्यात चित्रकार होण्याचं माझं स्वप्न दोरी तुटलेल्या पतंगासारखं भरकटत गेलं." [१०]

शालेय वयातच बोल्लींना चित्रपट पाहण्याचा छंद जडला. दर शनिवारी सर्व मित्र वर्गणी गोळा करून चित्रपट पाहण्यासाठी जात असत हे सांगताना ते म्हणतात," कुठलाही तेलगू, मराठी, हिंदी यापैकी एकही चित्रपट माझ्या नजरेतून सुटत नव्हता." [११] जे चित्रपट त्यांना आवडत ते चित्रपट दोन तीन वेळा बोल्ली पाहत असत. बोल्लींना मराठी नाटकं पाहण्याचंही वेड होतं. विशेषतः बाळ कोल्हटकरांची नाटकं त्यांना फार आवडत असत.

लक्ष्मीनारायण अंगाने फार हडकुळे होते. त्यामुळे लोक त्यांना नेहमी म्हणायचे"तुमचे वडील तालमीचे वस्ताद आणि तू असा काडीपैलवान !" [१२] लोकांचे असे नेहमीचे चिडवणे ऐकूण एकदा त्यांनी पैलवान व्हायचे ठरवले. बोल्ली दररोज सकाळ संध्याकाळ तालमीत जाऊ लागले जोर, बैठका मारू लागले. काही दिवस गेल्यानंतर त्यांना पैलवान झाल्यासारखे वाटू लागले. कोणाशी तरी कुस्ती धरावी या हेतूने ते लाल मातीच्या हौदात उतरले. आपल्यापेक्षा वयाने थोराड पैलवानाशी कुस्ती धरली. पैलवानाने बोल्लींच्या कानावर कुंदा नावाचा पैलवानी डाव हाणला. लक्ष्मीनारायण बेशुद्ध होऊन मातीत पडले. बोल्ली शुद्धीवर आले त्यावेळी तालमीत कुणीच नव्हते, बाहेर अंधार पडला होता. बोल्लींनी त्यावेळी तालमीला नमस्कार केला तो कायमचाच.

लक्ष्मीनारायण हे अत्यंत हळव्या मनाचे होते. मॅट्रिक पास झाल्यानंतर सोलापूर जिल्हा औद्योगिक सहकारी बँकेत कारकून म्हणून नोकरीला लागले. बोल्लींना लहापणापासूनच वाचनाची आवड होती. बँकेच्या ग्रंथालयातून नेहमी पुस्तके वाचण्यासाठी ते घरी नेत असत. एकदा बोल्लींनी रवींद्र भट यांची 'इंद्रायणी काठी' ही कादंबरी वाचनास घेतली. या कादंबरीतील ज्ञानेश्वरांची कथा वाचून रात्रभर रडले. असेच लहानपणी एकदा बोल्ली 'दीक्षा' नावाचा तेलगू चित्रपट पाहण्यासाठी आपल्या मित्रासोबत गेले होते. चित्रपटातील कारूण्यमय प्रसंग पाहून ते हमसून हमसून रडले होते. असे अनेक चित्रपट

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

पाहताना त्यांची अशीच स्थिती व्हायची. बोल्लींकडे पाहून त्यांचे मित्र म्हणायचे,“ या रडक्याला सोबत घेऊ नका.”[१३] त्यावेळी बोल्लींना वाटायचे“ का बरं मला त्यांच्यासारखं तटस्थ, स्थितप्रज्ञ राहता येत नाही.”[१४]

लक्ष्मीनारायण आणि त्यांची नाट्यसहकारी शोभा कल्याणी यांची निखळ मैत्री होती. अनेक नाटकांतून त्या दोघांनी काम केल्यामुळे त्यांची मैत्री दृढ झाली होती. पण बोल्लींच्या घरच्या मंडळींना त्यांचे प्रेमसंबंध आहेत असेच वाटायचे. दोघांचे एकमेकांना भेटणं घरच्यांना पसंत नव्हते. कारण लक्ष्मीनारायण यांचे लग्न झाले होते, त्यांना दोन मुली आणि दोन मुलगे होते. बोल्लींचे वडील इरय्या बोल्ली हे सोलापूरचे माजी महापौर होते. लक्ष्मीनारायण आपली प्रतिष्ठा धुळीला मिळवतोय असे त्यांना वाटत होते. तर त्यांचे काका अंबादास बोल्ली यांनी लक्ष्मीनारायणना शोभाला न भेटण्याची सक्त ताकीद दिली होती. या प्रकारामुळे बोल्लींनी फार मनाला लावून घेतले. बोल्लींना मधुमेहाचा त्रास होता. दिवस-रात्र काळजी करून त्यांची साखर वाढू लागली दहा बारा दिवस ते अंथरूणात पडून राहिले. वारंवार त्यांच्या मनात विचार येऊ लागले “ हीच नामी संधी आहे, कुणाच्याही प्रतिष्ठेला धक्का न पोहचवता प्राणत्याग करण्याची.”[१५] एके दिवशी लक्ष्मीनारायण बेशुद्ध होऊन पडले. बोल्लींच्या मामांनी आणि चुलत भावाने त्यांना सहकारी रूग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी अनेक प्रयत्न केले. पण त्यांच्या तब्बेतीमध्ये कोणताही फरक पडेना. कारण बोल्लींनी स्वतःला संपवण्याची तयारीच केली होती.

लक्ष्मीनारायण स्वतःपेक्षा इतरांचाच जास्त विचार करायचे. लक्ष्मीनारायण बँकेत हेड गोडाऊन कीपर पदावर होते जिल्हयातील सुमारे दीडशे गोडाऊन्स त्यांच्या ताब्यात होती. बोल्लींच्या हाताखाली दोन असिस्टंट होते. सर्व गोडाऊन्सच्या किल्ल्या बोल्लींकडेच असत. एवढी अधिकारी पदाची नोकरी सोडून कौटुंबिक जबाबदारी म्हणून त्यांचे कुटुंब चालवत असलेल्या फॅक्टरीमध्ये ते काम करू लागले. लक्ष्मीनारायण बोल्लींनी शोभा कल्याणीशी विवाह केला.

लग्नानंतर बोल्लींनी शोभासोबत वेगळा संसार थाटला. या दरम्यान बोल्लींचा मुलगा नरेशचं लग्न झालं. नरेशच्या लग्नानंतर स्वागत समारंभाचा कार्यक्रम ठेवण्यात आला. स्वागत समारंभाच्या कार्यक्रमासाठी सोलापूर शहरातील अनेक नामवंत मंडळी आली होती. पण बोल्लींचे चुलते दशरथ समारंभात आले नव्हते. दशरथने जोपर्यंत लक्ष्मीनारायण आणि त्यांची दुसरी पत्नी शोभा मंडपातून जाणार नाहीत तोपर्यंत समारंभात न येण्याचा निरोप पाठवला. लक्ष्मीनारायण यांचे वडील आणि भाऊ सत्यनारायण यांचेही तेच मत होते. तेंव्हा बोल्लींनी विचार केला '' जर मी आणि शोभा या समारंभातून निघून गेल्याने वडिलांना, भावाला आणि कुटुंबियांना बरं वाटत असेल तर आपण निघून जाऊया.'' [१६] लक्ष्मीनारायणांनी शोभाला बोलावून सर्व हकीकत सांगितली आणि दोघेही जड अंतकरणाने तिथून निघून गेले.

लक्ष्मीनारायण बोल्ली हे आज्ञाधारी होते. आपल्यापेक्षा वयाने मोठ्या व्यक्तींचा ते आदर करत असत. घरातील कोण्याही व्यक्तीला कधी ते उलट बोलत नव्हते. जे काही सांगितले जाई ते खाली मान घालून ऐकण्याचे काम ते करत असत. बोल्लींचे आपल्या कुटुंबावर खूप प्रेम होते. आई-वडिलांवर त्यांची खूप भक्ती होती. लक्ष्मीनारायण लहान होते त्यावेळी त्यांच्या आईच्या हातापायाच्या शिरा अचानक आखडून यायच्या. जवळजवळ अर्धाएक तास त्यांना भयंकर त्रास होत असे. अनेक उपचार करूनदेखील त्यांचा त्रास कमी झाला नाही. ज्या ज्या वेळी आईला त्रास व्हायचा त्या-त्या वेळी दहा-बारा वर्षाचे लक्ष्मीनारायण देवघरात देवासमोर हात जोडून बसायचे आणि देवाला विनंती करायचे. '' परमेश्वरा, हवं असेल तर माझं आयुष्य घे, पण आईला वाचवं'' [१७] पुढे अनेक वर्षानंतर त्यांच्या आईचा हा त्रास आपोआप कमी झाला. लक्ष्मीनारायण यांनी घरच्यांच्या विरोधात जाऊन दुसरे लग्न केले. या कारणाने घरातील कोणीही बोल्लींकडे जात नव्हते. बोल्लींनी 'मेघदूत इलेक्ट्रॉनिक्स' नावाने टीव्हीचे दुकान सुरू केले होते. अल्पावधीतच ते सोलापूरचे मुख्य डीलर झाले. या व्यवसायातून त्यांना बराच फायदा मिळत होता. पण एके

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

दिवशी बोल्लींचे वडील शोभा बोल्लींजवळ डोळयात पाणी आणून म्हणाले'' माझी सारी मुलं एका छताखाली एकत्र काम करताना पाहून मला म्हाताऱ्याला समाधान वाटेल तू समजावून सांग'' [१८] ही गोष्ट शोभा बोल्लींनी लक्ष्मीनारायणांना सांगितली. पितृभक्त लक्ष्मीनारायणांनी आपले चालते दुकान बंद केले आणि वडीलांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांच्या फॅक्टरीत ते काम करू लागले.

लक्ष्मीनारायण नास्तिक होते. देव,भूत, भविष्य या गोष्टींवर त्यांचा अजिबात विश्वास नव्हता. बोल्ली बँकेमध्ये गोडाऊन कीपर असताना त्यांच्या ताब्यात असणाऱ्या एका गोडाऊनमध्ये चोरी झाली. सर्व गोडाऊन्सच्या किल्ल्या बोल्लींकडे असत या कारणाने चोरीचा आरोप बोल्लींवर आला. लक्ष्मीनारायण अस्वस्थ झाले. चोरीच्या या आरोपातून कशी सुटका होणार याच्या विचारात ते पडले. अनेक प्रयत्न करून बोल्लींना आपल्यावरील आरोप खोटा आहे हे सिद्ध करता येईना. शेवटचा प्रयत्न म्हणून नास्तिक असणाऱ्या बोल्लींनी आपले कुलदैवत तिरूपती बालाजीला विनवणी केली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे दुसऱ्याच दिवशी गोडाऊनमध्ये चोरी करणाऱ्या व्यक्तीने स्वतः चोरी केल्याचे कबूल केले. या प्रसंगापासून नास्तिक असणारे लक्ष्मीनारायण आस्तिक बनले.

लक्ष्मीनारायण लहानपणापासूनच निस्वार्थी स्वभावाचे होते. बोल्लींचे वडील इरय्या बोल्ली सोलापूरचे महापौर होते. राजकीय वर्तुळात त्यांना खूप मान होता. सोलापूरच्या राजकारणात आमदार, खासदार, महापौर निवडीबाबत त्यांचे सल्ले घेतले जायचे. बोल्लींचे लहान भाऊ सत्यनारायण यांचाही सहकार क्षेत्रामध्ये मोठा दबदबा होता. बोल्लींनी मनात आणले असते तर त्यांच्या राजकारणाचा वापर करून अनेक स्वार्थ साधू शकले असते. पण लक्ष्मीनारायणांनी त्यांच्या राजकारणाचा स्वतःसाठी कधीही वापर केला नाही. लक्ष्मीनारायण युवक काँग्रेस दलाचे सक्रीय सभासद होते. काँग्रेसमध्ये दुफळी निर्माण झाली त्यावेळी लक्ष्मीनारायण यशवंतराव चव्हाणांच्या काँग्रेसकडून होते. सोलापूरात विधानसभा निवडणूकीच्या दरम्यान बोल्लींना शंकरराव मोहिते पाटील, वसंतदादा पाटील,

शालीनीताई पाटील ह्यांच्याकडून बोलावणे आले.  ही मंडळी इंदिरा काँग्रेसची होती. ह्या मंडळींनी बोल्लींना यशवंतराव चव्हाण काँग्रेसच्या उमेदवारास पाडण्यासाठी हवा तेवढा पैसा देण्याचे आमिष दाखवले. बोल्लींना अमाप पैसा मिळवता आला असता. पण मुळातच निस्वार्थी असणाऱ्या बोल्लींनी त्यांना नकार दिला.

लक्ष्मीनारायण बोल्ली हे सामान्य बुद्धीचे, खोडकर, नकारात्मक विचार करणारे, भित्र्या स्वभावाचे, हळव्या मनाचे, एकलकोंडे, छंदी, स्वतःपेक्षा इतरांचा विचार करणारे, आज्ञाधारी, आपले आई-वडील आणि कुटुंबावर प्रेम करणारे, निस्वार्थी वृत्तीचे आणि सरळ स्वभावाचे व्यक्ती आहेत. अशा या व्यक्ती म्हणून सुस्वभावी असणाऱ्या लक्ष्मीनारायण बोल्लींचे व्यक्तिमत्त्व विविध रंगी होते.

लक्ष्मीनारायण बोल्ली : व्यक्तिमत्त्व

## १) चित्रकार :

लक्ष्मीनारायण बोल्लींना चित्रे काढण्याची आवड होती. पण त्यांना चित्रे काढता येत नव्हती. बोल्लींच्या वर्गामध्ये बाबू लिंबोळे नावाचा विद्यार्थी होता. बाबू देवदेवतांची सुरेख चित्रे काढायचा. लक्ष्मीनारायण बाबूला एक आणा देऊन त्याच्याकडून मारूतीचं चित्र काढायला शिकले. एकदा वर्गामध्ये म्हसवडकर सरांनी ज्याला चित्र काढता येतं त्याला फळयावरती चित्र काढण्यास सांगितले. कोणीही चित्र काढण्यासाठी पुढे येईना. बोल्लींनी घाबरत घाबरत बोट वर केले आणि फळ्यावरती चित्र काढण्यासाठी गेले. एका हातात पर्वत आणि दुसऱ्या हातात गदा घेऊन आकाशात उडणाऱ्या मारूतीचे चित्र त्यांनी काढले. सरांनी बोल्लींचे कौतुक केले आणि घरी चित्रकलेचा सराव करण्यासाठी एक पांढरा शुभ्र कागद दिला.या प्रसंगावरूनच बोल्लींना त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय झाला. '' आतापर्यंत माझं व्यक्तिमत्त्व अत्यंत सामान्य, कुणीही हेटाळणी करावं असं होतं कोणी शिक्षकच काय एखादा आगाऊ विद्यार्थी पुढ्यात आला की मी टरकायचो. आपला चेहरा

आपली बुद्धी बेताचीच आहे याची मला पूर्ण जाणीव होती, म्हणून माझ्यात एक अपराधी मन सतत जागत रहायचं. कुठलीही गोष्ट'यह अपनी बस की बात नहीं' म्हणत मी स्वतःला दूर ठेवायचो, पण एकदा आघटीत घडलं अल्प स्वरूपात का होईना आपल्यालाही एक व्यक्तिमत्त्व आहे याची मला प्रचिती आली. माझ्या या व्यक्तिमत्त्वाचा परिचय माझे चित्रकला शिक्षक त्र्यंबक म्हसवडकर सर यांनी करून दिला.'' [११]

रोटरी क्लबने १४ वर्षाखालील मुलांसाठी जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धा आयोजित केल्या होत्या. या स्पर्धेसाठी बोल्लींना म्हसवडकर सरांनी कोंबड्याच्या झुंजीचे चित्र काढण्यास सांगितले. बोल्लींनी दोन-तीन दिवस सराव करून चित्र काढले. चित्रामध्ये योग्य ते रंग भरून म्हसवडकर सरांकडे दिले. सरांनी ते चित्र स्पर्धेसाठी पाठवले. पंधरा दिवसानंतर बोल्लींना दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस मिळाल्याचे सोलापूर समाचारमध्ये छापून आले.मुख्याध्यापकांनी बोल्लींना ऑफिसमध्ये बोलावून त्यांचे अभिनंदन केले. तसेच शाळेतील फलकावर बोल्लींचे नाव लिहून त्यांचा गौरव करण्यात आला. बोल्लींना राज्यपालांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले.

लक्ष्मीनारायण ज्या-ज्या वेळी घरातील बाजार आणण्यासाठी नवी पेठेतून जायचे त्यावेळी एका ठिकाणी त्यांचे पाय आपोआप थांबायचे. ते ठिकाण होते यल्ला दासी या चित्रकाराचे दुकान. दुकानाच्या पायरीवर लक्ष्मीनारायण तासनतास काढली जाणारी चित्रं पाहत बसायचे. चित्रपट पाहण्यासाठी भागवत थिएटरमध्ये जायचे असेल तर ते एक तास अगोदरच जात असत. तेथे जाऊन चित्रकार कादर यांच्याकडून साकारली जाणारी मीनाकुमारी, अशोक कुमार, दिलीप कुमार, नर्गीस, राजकपूर अशा अनेक चित्रपट कलावंतांची चित्रे पाहत बसत असत. तसेच मुन्शी आर्ट, चाफळकर पेंटर, काळे पेंटर, टेंभुर्णीकर पेंटर, पासकंटी पेंटर आदींच्या दुकानात लक्ष्मीनारायण चित्रकला पाहण्यासाठी जात असत. बोल्लींची चित्रकलेची आवड पाहून म्हसवडकर सरांनी जे.जे.स्कूल ऑफ आर्ट या कॉलेजमध्ये त्यांचा प्रवेश अर्ज दाखल केला. बोल्लींच्या वडीलांना चित्रकारीता

पसंत नव्हती. बोल्लींचे चित्रकलेचे साहित्य त्यांनी गटारात फेकून दिले येथेच चित्रकार बोल्ली यांची चित्रकला संपुष्टात आली.

### २) प्रसंगावधानी :

लक्ष्मीनारायण बोल्लींचा स्वभाव मुळातच भित्रा होता. पण प्रसंगानुरूप त्यांच्यामध्ये कोठून धाडस यायचे कोणास ठाऊक. बोल्ली भित्रे असले तरी प्रसंगावधानी होते. बोल्लींच्या फॅक्टरीजवळ मकबूल मडकी यांची चादरीची फॅक्टरी होती. एका रात्री मडकींच्या दोनशे बाय दोनशे फूट फॅक्टरीच्या पत्र्यावर वाळत घातलेल्या ताण्याबाण्याच्या सूताला आग लागली. एकमेकाला लागून असणाऱ्या अनेक लड्या आणि एकामागून एक घर जळण्याची परिस्थिती निर्माण झाली. मकबूलच्या घरी कोणीच पुरूष मंडळी नव्हती. घरात फक्त स्त्रिया आणि लहान मुली होत्या. आग पाहून त्यांनी आरडा-ओरडा केला. अनेक लोक तिथे जमले होते पण कोणीही आग विझवण्यासाठी पुढे गेले नाही. बोल्लींनी प्रसंगाचे गांभीर्य ओळखून क्षणाचाही विलंब न करता एक मोठा स्टूल घेतला. स्टूलावरून लडी पकडण्याचा प्रयत्न करू लागले. बोल्लींपासून दोन तीन फुटांवर ती लडी असल्याने ती त्यांच्या हाताला येईना. तेंव्हा बोल्लींनी उंच उडी मारून ती लडी पकडली. लडी जळालेली असल्या कारणाने ती तुटली आणि बोल्ली अंगणात कोसळले. जमीनीवर ते इतक्या जोरात आपटले की त्यांच्या हातातील घड्याळ चक्काचूर झाले. लक्ष्मीनारायण बोल्लींच्या या प्रसंगावधानीपणामुळे अनेक घरे पेटण्यापासून बचावली गेली.

लक्ष्मीनारायण मित्रांसोबत त्यांच्या अशोक चौकातील फॅक्टरीशेजारी नेहमी हॉलीबॉल खेळायचे. हॉलीबॉलच्या मैदानापासून थोड्याच अंतरावर कुंचीकोरवी लोक रहात होते. या कुंचीकोरव्यांमध्ये एक वेडी बाई होती. रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना ती शिव्या देत असायची. असेच एके दिवशी चार पाच तूलगु तरूणी जात असताना त्यातील कोणीतरी त्या वेडीची छेड काढली. वेडी चवताळून त्यातील एका मुलीकडे चाल

करून गेली. वेडीने त्या मुलीच्या झिंज्या धरून तीला रस्त्यावर पाडले. मुलगी रस्त्यावर पडताच वेडीने बाजूला पडलेला मोठा दगड उचलून घेतला. दगड मुलीच्या डोक्यात घालणार एवढ्यात हॉलीबॉल खेळणारे लक्ष्मीनारायण पळत आले आणि त्यांनी वेडीला ढकलले. वेडी बाजूला जाऊन पडली एवढ्यात ती मुलगी उठून पळाली. वेडीने रागाने पुन्हा दगड उचलण्याचा प्रयत्न केला. पण बोल्लींनी तिचे दोन्ही हात धरले. वेडी कुंचेकोरवी भाषेत बोल्लींना शिव्या देऊ लागली. वारंवार त्यांच्या तोंडावर थुंकू लागली. वेडीच्या थुंकीने बोल्लींचा चेहरा भरून गेला. एवढ्यात तिच्या समाजातील चार पाच तरूण आले आणि त्यांनी वेडीला ओढत नेली. वेडीचा रूद्र अवतार पाहून बोल्लींचा एकही मित्र त्यांना सोडवण्यास गेला नाही. पण बोल्लींच्या धाडसामुळे त्या मुलीचा जीव वाचला.

## ३) वक्तशीर :

लक्ष्मीनारायण बोल्लींची आपल्या कामावर खूप निष्ठा होती. कामाच्या बाबतीत बोल्ली वेळेला फार महत्त्व देत असत. लक्ष्मीनारायण सोलापूर जिल्हा औद्योगिक सहकारी बँकेच्या सदर बझार शाखेचे मुख्याधिकारी होते. बँकेमध्ये कडक शिस्तीचे अधिकारी म्हणून त्यांची ओळख होती. बँकेतील कोणत्याही कामात हेळसांड-दिरंगाई आणि गैरव्यवहार केलेला त्यांना खपत नसे. बोल्ली नेहमी बँकेत वेळेच्या दहा मिनिटे अगोदर हजर असायचे. बँकेची वेळ सकाळी ८.३०ते १०.३० आणि संध्याकाळी ५ ते ६.३० अशी होती. एके दिवशी बोल्ली संध्याकाळी ४.४० ला बँकेत आले. बोल्ली बँकेत येण्याअगोदर बँकेचे चेअरमन बँकेत येऊन बसले होते. चेअरमन साहेबांना माहिती नव्हते की त्या शाखेची संध्याकाळची वेळ ५ ते ६.३० होती. चेअरमनांच्या मते बँकेची वेळ ४.३० ची होती. म्हणून ते बोल्लींवर संतापले उशीरा येण्याबद्दल त्यांना बडबडू लागले. बोल्लींनी चेअरमन साहेबांना बँकेच्या भिंतीवरील वेळेचा बोर्ड, बँकेच्या पासबुकावरील

वेळ, नियम दाखवले तेव्हा चेअरमन शांत झाले. तेंव्हा बोल्ली म्हणाले" साहेब, मी बँकेत कधीही उशिरा येत नसतो लोक माझ्या येण्यावरून घड्याळे लावतात" [२०] खरे पाहता बँकेच्या कारकीर्दीत बोल्ली कधीही उशिरा गेले नाहीत.

या प्रसंगापासून चेअरमन साहेब बोल्लींवर चिडून होते. खरेच बोल्ली वेळेवर येतात की नाही हे पाहण्यासाठी ते एके दिवशी धो-धो कोसळणाऱ्या पावसात बँकेत आले. बँकेत येताच त्यांनी बोल्लींच्या केबिनकडे पाहिले. बोल्ली केबिनमधून त्यांना नमस्कार करत होते. चेअरमन साहेब येण्याअगोदर बोल्ली पावसात भिजत नेहमीच्यावेळी बँकेत हजर झाले होते. बोल्लींना पाहून चेअरमन साहेबांना आश्चर्य वाटले आणि ते म्हणाले " वाटलं नव्हतं तुम्ही एवढ्या पावसातदेखील वेळेवर याल म्हणून." [२१] लक्ष्मीनारायण सदर बझार शाखेत आल्यापासून बँकेतील सर्व कर्मचारी वेळेच्या अगोदर दहा मिनिटे बँकेत येऊ लागले. बँकेच्या कामाच्या वेळेत एकही कर्मचारी बँकेत इतरत्र फिरत नव्हता.

### ४) सहनशील :

लक्ष्मीनारायण बोल्ली हे अतिशय सहनशील असे व्यक्तिमत्त्व होते. अनेक प्रसंगातून त्यांची ही सहनशील वृत्ती दिसून येते. लक्ष्मीनारायण बोल्ली आणि शोभा कल्याणी यांचे मैत्रीचे संबंध होते. पण त्यांच्या घरच्यांना ते मान्य नव्हते. अनेक वेळा घरच्या लोकांनी याबाबत घरामध्ये त्यांना विचारणा केली होती. शोभाला भेटण्यास त्यांना बंदी होती. घरचे लोक त्यांची पत्नी भूलक्ष्मी हीला बोल्लींना शोभाविषयी विचारण्यास सांगायचे. भूलक्ष्मी बोल्लींना विविध प्रश्न विचारत असे. रात्रभर त्यांना झोपू देत नव्हती. सारखे शोभाचाच विषय काढत असे. दिवसभर घरच्यांचा छळ आणि रात्रभर बायकोकडून बोल्लींचा छळ होत होता. बोल्लींना घरामध्ये नजरकैदेत ठेवण्यात आले होते. या सर्व गोष्टींचा परिणाम होऊन बोल्लींना हृदयविकाराचा सौम्य झटका आला. बोल्लींना हॉस्पिटलमध्ये ठेवण्यात आले. अनेक लोक बोल्लींना भेटण्यासाठी येत होते. पण त्यातील

बरेच लोक शोभा कल्याणी लक्ष्मीनारायणांना भेटण्यास येते की नाही हे पाहण्यासाठी येत असत. हे सर्व सहन करताना बोल्ली म्हणतात,'' हे मला कळत होतं पण काय करणार ? मोठ्यांच्या विरोधात बंड करण्याची माझी मूळ प्रवृत्तीच नाही. मोठ्यांचा मान राखत, तोंड दाबून बुक्क्यांचा मार मी सहन करीत होतो.'' [२२]

शोभाबरोबर बोल्लींचे मैत्रीचे संबंध जुळले त्यावेळी त्यांचे वय ४६ वर्षांचे होते. या वयापर्यंत बोल्ली कधीही कोणाला उलट बोलले नाहीत. कोणत्याही प्रकारचे बंड त्यांनी केले नाहीत. यावरून लक्ष्मीनारायण हे किती सहनशील वृत्तीचे होते याचा प्रत्यय येतो.

## ५) **कपड्यांचे शौकीन :**

लक्ष्मीनारायण बोल्ली लहानपणापासून काळे, नकटे, वेडपट म्हणून गणले गेलेले. तसेच त्यांचा पोषाखही भावनाऋषी पेठेतील इतर साळ्यांप्रमाणेच होता. बोल्ली ज्यावेळी बँकेत नोकरीला लागले त्यावेळी त्यांनी आपला पेहराव पूर्णपणे बदलला. लक्ष्मीनारायण आकर्षक रंगाचा शर्ट, टेलरीनची पँट, पायात मोजे, पॉलीश केलेले चकचकीत बूट असा पेहराव करू लागले. तेंव्हा ते म्हणतात'' माझ्या व्यक्तिमत्त्वाचा सारा नूरच पालटून टाकला. आचारानं, विचारानं आणि पेहरावानं मी आकर्षक बनलो.''[२३] बोल्लींना आकर्षक पेहराव करण्याचा छंद जडला. बँकेमध्ये बोल्लींचा निशिकांत बेत नावाचा मित्र होता. निशिकांतही कपड्यांचा जबरदस्त शौकीन होता. त्यामुळे दोघांची गट्टी जमली. दोघे बाजारात जायचे आणि बाजारात नवीन प्रकारचे कोणते कापड आले आहे ते पाहून ते लगेच खरेदी करायचे.

## ६) **विणकर :**

लक्ष्मीनारायण यांचा जन्मच एका विणकर कुटुंबात झाला. बोल्लींच्या कुटुंबामध्ये अगदी त्यांच्या पणजोबांपासून हातमागावर साड्या, चादरी विणण्याचा व्यवसाय चालत

आला होता. बोल्लींच्या घरातच हातमागांवर वस्त्र विणण्याचा कारखाना होता. घरातील सर्वजण हातमागावर काम करत होते. बोल्ली घराण्यातील लहान मुलांना कापड विणण्याचे बाळकडू घरातच दिले जायचे. अशाचप्रकारे लहान वयातच लक्ष्मीनारायण हातमागावर कापड विणण्यास शिकले. लहानपणी बोल्ली ज्यावेळी शाळेला जाऊ लागले त्यावेळी त्यांचे वडील त्यांना आणि दशरथला बाजारातून तयार चड्ड्या आणायचे पण या चड्डींना बटणंच नसायची. लक्ष्मीनारायण चड्डीला करदोड्यात अडकवत असत. एके दिवशी त्यांनी बटणाबद्दल वडीलांकडे तक्रार केली. तेंव्हा त्यांच्या वडीलांनी त्या दोघांना घरातील मागावर स्वतः कापड विणून चड्डी शिऊन घेण्याचा सल्ला दिला. तेंव्हापासून लक्ष्मीनारायण दरवर्षी उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये हातमागावर कापड विणायचे आणि त्याचे कपडे शिवून घ्यायचे. कापड विणण्याबरोबरच लक्ष्मीनारायण पाजणी जोडणे, कांड्या भरणे, लड्या उकलणे इत्यादी सर्व कामं लहान वयातच करू लागले. लक्ष्मीनारायण मॅट्रिकच्या परीक्षेत नापास झाले. त्यामुळे घरातील हातमागाच्या कारखान्याची सर्व जबाबदारी त्यांच्यावर आली. बोल्लींच्या हातमागावर त्यावेळी टमटम वाणाचं कलकत्ता क्वालिटीच्या साड्यांचे उत्पादन चालू होते. बोल्लीं घरातील तयार झालेल्या साड्या संघात देणे, तिथूनच ताण्याचं, बाण्याचं सूत आणणे, संघाला दिलेल्या साड्यांच्या विक्रीची रक्कम आणणे आणि विणकरांना मजुरी देणे इत्यादी जबाबदाऱ्या पार पाडत पक्के विणकर झाले.

### ७) व्यावसायिक :

लक्ष्मीनारायण बोल्ली यांनी स्वतःचा असा कोणता व्यवसाय सुरू केला नव्हता. पण एका यशस्वी व्यावसायिकाला आवश्यक असणारे गुण त्यांच्यामध्ये होते. लक्ष्मीनारायण बोल्लींच्या परिचयाचे सुहास बांदल 'सूर्या' नावाच्या दूरदर्शन संचाची निर्मिती करत होते. बांदल यांना त्यांच्या टी.व्ही साठी एका विश्वासू डीलरची आवश्यकता

होती. बोल्लींनी त्यांची डीलरशीप घ्यावी अशी त्यांची इच्छा होती. ती इच्छा त्यांनी बोल्लींजवळ बोलून दाखविली. बोल्लींनी कधीही कोणताच व्यवसाय केला नव्हता. तसेच बोल्लींकडे माल खरेदी करण्यासाठी पैसा नव्हता. तेंव्हा बोल्लींनी एकही पैसा भांडवल न गुंतवता डीलर होण्यास होकार दिला. बांदल मालाची जशी विक्री होईल तसे पैसे घेण्याच्या आणि दुकानासाठी बोल्लींनी स्वतःची जागा वापरण्याच्या अटीवर डीलरशीप देण्यास तयार झाले. घरी गेल्यानंतर बोल्लींनी आपले वडील, चुलते आणि भाऊ यांना एकत्र बोलावून डीलरशीपबाबतची माहिती दिली. तेंव्हा वडील बोल्लींना म्हणाले, " पण तुला हा धंदा जमेल का ? गळयात पिशवी अडकून कविता वाचत हिंडतोस?" [२४] बोल्लींनी वडीलांना योग्य पद्धतीने धंदा करून यशस्वी होण्याची ग्वाही दिली. बोल्लींनी ३० नोव्हेंबर १९८९ रोजी'मेघदूत इलेक्ट्रॉनिक्स' नावाने दुकान सुरू केले. एक दिवशी बोल्लींची बँकेतील त्यांच्या असिस्टंशी भेट झाली. पलवरी नावाचे ते असिस्टंट बोल्लींनी नोकरी सोडल्यानंतर शाखाधिकारी झाले होते. त्यांच्या बँकेकडे अनेक सुतगिरण्यांतील कामगार सभासद होते. बोल्लींनी आणि पलवरी यांनी मिळून कामगारांना बँकेकडून हप्त्यावर टी.व्ही. देण्याची योजना आखली. या योजनेंतर्गत बोल्लींना टी.व्ही.ची रोख रक्कम बँकेकडून मिळणार होती. अल्पावधीतच ही योजना त्यांनी अंमलात आणली. हजारो टी.व्ही चा खप झाला. महिन्याभरात लाखाहून अधिक रक्कम बोल्लींना मिळाली. बोल्लींनी बांदल यांना पहिलाच चेक ९९ हजारांचा दिला. अल्पावधीतच लक्ष्मीनारायण बोल्ली एक यशस्वी डीलर म्हणून नावारूपास आले.

## ८) दिग्दर्शक :

लक्ष्मीनारायण बोल्ली सोलापूरातील भावनाऋषीपेठेत रहात होते. भावनाऋषीपेठेतील हनुमान मंदीरासमोर प्रत्येक हनुमान जयंतीला उत्सव होत असे. उत्सवादरम्यान तेथे विविध कार्यक्रम होत असत. सोलापूर समाचारमध्ये छापून आलेले

कुमार कोठावळे यांचे 'झासी की राणी' हे प्रहसन बोल्लींच्या वाचनात आले. बोल्लींच्या बालमनाला ते खूप आवडले आणि त्यांनी हनुमान जयंतीला ते सादर करण्याचे ठरवले. पंधरा मिनिटांच्या या प्रहसनासाठी लागणारी पंधरा पात्रे त्यांनी निश्चित केली. स्वतः दिग्दर्शकाची भूमिका स्विकारून बोल्लींनी हे नाटक बसवले. नाटकाला लागणारे सर्व साहित्य त्यांनी मित्रांकरवी गोळा केले. हनुमान जयंतीदिवशी मारूतीच्या मंदीरासमोर बोल्लींनी नाटक सुरू केले. नाटक पंधरा मिनिटात संपले. लोकांनी बिस्तरा मांडेपर्यंत नाटक संपले. बोल्लींना पुन्हा नाटक सादर करण्यास सांगितले. रात्रभर कार्यक्रम चालणार या हेतूने लोक येतच होते. लोक येतील तसे बोल्लींना पुन्हा पुन्हा नाटक सादर करावे लागले. जवळ-जवळ सहा ते सात वेळा त्यांनी नाटक सादर केले. नाटक संपल्यानंतर भावनाऋषी पेठेतील नाटकाचे जाणकार राम पवार यांनी स्टेजवर जाऊन बोल्लींसह सर्व बालकलाकारांचे कौतुक केले. बोल्ली त्यावेळी १३ वर्षांचे होते. बोल्लींनी दिग्दर्शन केलेले हे पहिले नाटक. यापुढे त्यांनी अनेक नाटकांचे दिग्दर्शन केले.

लक्ष्मीनारायण मॅट्रिक नापास झाल्यानंतर बँकेमध्ये नोकरीला लागले. १९६६ मध्ये सोलापूरातील सर्व बँकांचे स्नेहसंमेलन भरवण्यात आले होते. या स्नेहसंमेलनामध्ये अनेक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. बोल्लींच्या बँक सहकाऱ्यांनी एकांकिका स्पर्धेसाठी पद्माकर डावरे लिखित'पांडव प्रताप' ही एकांकिका बसवण्याचे ठरवले. एकांकिकेची सर्व सूत्रे बोल्लींनी आपल्याकडे घेतली. बोल्लींच्या दिग्दर्शनाखाली ती एकांकिका सादर केली. दहा-बारा बँकांच्या स्पर्धेमध्ये त्यांच्या नाटिकेला सर्वोत्तम नाटिकेचे आणि दिग्दर्शनाचे पारितोषिक मिळाले. पुढे कामकार नाट्य स्पर्धेमध्ये बोल्लींनी प्रा.मधुकर तोरडमल लिखित 'काळे बेट लाल बत्ती' ह्या नाटकाचे दिग्दर्शन केले. बोल्ली प्रत्येक वर्षी होणाऱ्या नाट्य स्पर्धेसाठी नाटक बसवू लागले. १९७८ मध्ये श्रीराम गोजमगुंडे यांनी 'पुन्हा पुन्हा मोहोनजोदारो' या मराठीमध्ये अनुवाद केलेल्या नाटकाचे दिग्दर्शन केले. १९८० मध्ये दिलीप परदेशी यांचे 'काळोख देत हुंकार' हे नाटक सादर केले. या नाटकाला सुमारे बत्तीस

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

नाटकातून श्रेष्ठ दिग्दर्शनाचा पहिला पहिला पुरस्कार मिळाला याच स्पर्धेत उपांत्य फेरीमध्ये २०८ नाटकामधून बोल्लींना दिग्दर्शनाचे दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस मिळाले. तसेच सांगली येथे झालेल्या राज्य नाट्य स्पर्धेत दिलीप परदेशीचं 'मन धुवांधार' हे नाटक सादर केले. या नाटकाला श्रेष्ठ दिग्दर्शनाचा दुसरा पुरस्कार मिळाला. १९८३ साली बोल्लींनी चि.त्र्य.खानोलकरांनी लिहिलेले 'कालाय तस्मै नमः' हे काव्यनाट्य खूप कष्ट घेऊन बसवलं हे नाटक त्यांनी महाराष्ट्र राज्य नाट्य महोत्सव स्पर्धेमध्ये सादर केले. बोल्लींना या नाटकासाठी श्रेष्ठ दिग्दर्शनाचं पहिलं बक्षीस मिळालं. लक्ष्मीनारायण यांच्यातील दिग्दर्शकाने अशा अनेक नाटकांचे दिग्दर्शन केले आणि अनेक पुरस्कार मिळवले.

### ९) नाटककार :

लक्ष्मीनारायण बोल्ली हे केवळ दिग्दर्शकच नव्हते तर ते एक उत्तम नाटककारही होते. बोल्लींनी जवळ-जवळ चार दशके नाट्यक्षेत्रात घालवली. 'मी हरिणी तू व्याध' हे बोल्लींनी लिहिलेलं पहिलं नाटक नाट्य स्पर्धेमध्ये सादर केलं. या नाटकातील अभिनयासाठी शोभा आणि नागन्ना यांना पुरस्कार मिळाले. तसेच बोल्लींच्या या पहिल्या नाटकाचे खूप कौतुक झाले. नाट्यक्षेत्रात काम करत असतानाच बोल्लींच्या अनेक नाटककार, दिग्दर्शक, अभिनेते यांच्याशी ओळखी झाल्या होत्या. असेच एकदा बोल्लींची श्रेष्ठ दिग्दर्शक जब्बार पटेल यांच्याशी ओळख झाली. जब्बार पटेल यांना माहित होते की साळी लोक तेलंगणातील जमीनदार, रेड्डी, दोरा यांच्या जाचाला कंटाळून सोलापूरात येऊन स्थायिक झाले आहेत. जब्बार पटेल यांनी याच विषयावर बोल्लींना नाटक लिहिण्यास सांगितले. बोल्लींनी जब्बार पटेल यांचे म्हणणे मनावर घेतले आणि त्यातूनच 'हद्दपार' हे नाटक आकारास आले. या नाटकामध्ये बोल्लींनी तेलंगणातील जातीयता, उपेक्षितांचे जीवन, गरीबांवर होणारे अन्याय, अत्याचार इत्यादीचे चित्रण केले होते. तसेच मधेमधे तेलगू संवादांचा आणि लोकगीतांचा समावेश केला होता. हे नाटक खूपच गाजले.

कामगार कल्याण नाट्य स्पर्धा, राज्यनाट्य महोत्सव यांमध्ये या नाटकाचे प्रयोग झाले. या नाटकाला अनेक पारितोषिके मिळाली.

'हद्दपार' या नाटकानंतर बोल्लींनी 'स्वीकार' हे नाटक लिहिले. शोभा कल्याणीने या नाटकाचे दिग्दर्शन केले आणि राज्य-नाट्य स्पर्धेमध्ये ते सादर केले. नाटकाला पहिल्या क्रमांकाचे बक्षीस जाहीर होताच शकूर सय्यद या बोल्लींच्या मित्राने त्यांना खांद्यावर घेतले आणि सर्व थिएटरमध्ये नाचू लागले. तेंव्हा प्रेक्षकांनी केलेल्या टाळ्यांच्या गडगडाटाने बोल्ली भारावून गेले. बोल्ली या घटनेला त्यांच्या आयुष्यातील सोनेरी अक्षरांनी लिहून ठेवावी अशी घटना मानतात.

१९९६ साली बोल्लींनी'विरहिणी वासवदत्ता' हे काव्य नाट्य महाराष्ट्र नाट्य महोत्सवाच्या स्पर्धेत सादर केले. या नाटकाला पहिल्या क्रमांकाच्या बक्षीसासह श्रेष्ठ दिग्दर्शन, अभिनय, नाट्यलेखन असे एकूण सहा पुरस्कार मिळाले. तब्बल बारा-तेरा वर्षापूर्वी लिहिलेलं हे नाटक रंगमंचावर आलं आणि त्याच्यावर अनेक पुरस्कारांचा वर्षाव झाला. तसेच १९९७ साली बोल्लींनी तेलगुतील वेमना नावाच्या संतकवींवर आधारित'विश्वकवी वेमना' हे नाटक लिहून सादर केले. नाटकांबरोबरच बोल्लींनी काही एकांकिकाही लिहिल्या आहेत. १९७८ साली बार्शी येथे झालेल्य एकांकिका स्पर्धेत त्यांनी लिहिलेली 'शॅडो' ही एकांकिका सादर केली. या एकांकिकेला प्रथम क्रमांकाचा पुरस्कार जाहीर झाला. पण दुर्दैवाने या स्पर्धेचा बक्षीस समारंभच झाला नाही.

**१०) कथाकार :**

लक्ष्मीनारायण बोल्लींनी नाटक, एकांकिकांच्या लेखनाबरोबरच कथालेखनही केले आहे. विविध वृत्तपत्रे, मासिके आणि साप्ताहिकांतून बोल्लींच्या अनेक कथा प्रकाशित झाल्या आहेत. बोल्लींना विनोदाची आवड होती. या आवडीतून त्यांनी विनोदी कथांचे लेखन केले. या कथांमध्ये 'मी शनीचा भक्त बनतो' , 'दिवाळीच्या आहेरा सौच्या

16328

माहेरा', 'काटेरी कुंपण', 'भरवश्याच्या म्हशीला', '... आणि मी कवी झालो' इत्यादी कथांचा समावेश आहे. तसेच पुण्यातील 'स्वराज्य' या साप्ताहिकातून'सोसायटीची तपासणी',आला कावळा गेला कावळा,' 'नळ पाणी आणि मी' या विनोदी कथा प्रसिद्ध झाल्या. तसेच 'रक्त घाम', 'अश्रू', 'दिसतं तसं नसतं' 'इथे फुलांना मरण जन्मता' अशा भावनाप्रधान कथा प्रकाशित झाल्या. या साप्ताहिकातून कथा लेखन केल्यामुळे लक्ष्मीनारायण बोल्ली कथाकार म्हणून अनेकांच्या परिचयाचे झाले. सोलापूरातील 'संचार' वृत्तपत्रातूनही त्यांच्या काही कथा प्रकाशित झाल्या आहेत. अशा या कथाकार लक्ष्मीनारायण बोल्लींनी कथा लिहिता लिहिता एके दिवशी स्वतःच्या जीवनाचीच कथा 'एका साळियाने' या रूपाने लिहिली.

## ११) गीतकार :

लक्ष्मीनारायण बोल्ली हे अनेक मासिके, साप्ताहिकांचे नियमितपणे वाचन करत असत. एकदा'मनोहर' साप्ताहिकामध्ये नवोदित गीतकारांसाठी कार्यशाळा आयोजित केल्याचे वृत्त छापून आले. कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी स्वरचित दोन गीतं पाठवायची होती. गीतांची पडताळणी मान्यवरांकडून झाल्यानंतर त्यातून काही गीतकारांचीच निवड कार्यशाळेसाठी होणार होती. वृत्त वाचताच बोल्लींमधील गीतकार जागा झाला. बोल्लींनी दोन गीतं लिहिली. ही गीतं घेऊन बोल्ली दत्ता हलसगीकरांकडे गेले. हलसगीकरांनी त्यांच्या गीतांमध्ये काही दुरूस्त्या सुचवल्या. गीतांमध्ये दुरूस्त्या करून ती मनोहर साप्ताहिकाकडे पाठविली. बोल्लींच्या गीतांची निवड झाली तसेच कार्यशाळेसाठीही त्यांची निवड करण्यात आली. शिबीरामध्ये गंगाधर महांबरे, देवकीनंदन सारस्वत, सुधाकर इर्लेकर, मंगेश पाडगावकर, ग.दि.माडगूळकर इत्यादी गीतकारांनी मार्गदर्शन केले. शिबीरामध्ये बोल्लींनी या दिग्गजांच्या मार्गदर्शनाखाली गीत रचनेतील अनेक बारकावे

आत्मसात केले. अनेक गीतांची रचना केली आणि यातूनच त्यांचा 'गीत मार्कंडेय' हा गीतसंग्रह आकारास आला.

### १२) लावणीकार :

लक्ष्मीनारायण बोल्लींना लहानपणापासूनच चित्रपट पाहण्याची आवड होती. बोल्लींनी तेलगू , हिंदी, मराठी भाषेतील अनेक चित्रपट पाहिले होते. लक्ष्मीनारायणांनी एकदा 'कविराय रामजोशी' हा चित्रपट पाहिला. चित्रपटातील सवाल जबाबाच्या लावणीने त्यांच्या मनात घर केले. चार पाच दिवसांच्या प्रयत्नाने त्यांनी एक लावणी लिहिली. याच दरम्यान 'महाराष्ट्र राज्य तमाशा कला व कलावंत विकास मंडळ' या संस्थेने लावणी लेखन स्पर्धा आयोजित केल्या होत्या. स्पर्धेसाठी बोल्लींनी लावणी पाठवली. बोल्लींच्या लावणीला उत्कृष्ट लावणीलेखनाचा पुरस्कार मिळाला. पुरस्कारानंतर पुढील वर्षी पुन्हा लावणी लेखन स्पर्धेसाठी त्याच संस्थेच पत्र बोल्लींना आले. बोल्लींनी लावणी लेखनाचा ध्यास घेतला. दिवस रात्र लावणीच्या विचारात बुडून गेले. बोल्लींची झोप उडाली, जेवणावरही त्याचा परिणाम होऊ लागला. काही केल्याने त्यांना लावणीसाठी शब्दच सुचेनासे झाले. शेवटी बोल्लींनी लावणीचा नाद सोडला आणि भरपेट जेऊन झोपी गेले. मध्यरात्री अचानक त्यांना जाग आली आणि लावणीचे शब्द त्यांच्या कानी घुमू लागले. लावणी लिहिण्यासाठी त्यांनी लाईट लावली पण लाईट गेली होती. अंधारातच बोल्लींनी लावणी लिहिली.

" लयास दुनिया गेली जरीही....
कवने माझी तरतील.
अशी लावणी लिहीन सखे गं,
शब्द फेर ते धरतील" [२५]

जवळ-जवळ छप्पन पानांची लावणी बोल्लींनी दत्ता हसलगीकरांना फोनवरूनच ऐकवली. तेंव्हा हलसगीकर म्हणाले,'' बोल्ली, आजपर्यंत तुम्ही जेवढं लिहिलंत त्यापेक्षा एवढी एकच लावणी लिहिली असती, तरीही, आजच्या एवढंच नाव तुमचं झालं असतं.'' [२६] बोल्लींनी ही लावणी स्पर्धेसाठी पाठवली. लावणीला उत्कृष्ट लावणी लेखनाचा पुरस्कार मिळाला तोही मराठी चित्रपटातील श्रेष्ठ दिग्दर्शक, निर्माते आणि विनोदी अभिनेते दादा कोंडके यांच्या हस्ते.

## १३) अभिनेता :

लक्ष्मीनारायण बोल्लींनी अनेक नाटकांचे दिग्दर्शन केले, काही नाटके स्वतःलिहिली तसेच अनेक नाटकांतून त्यांनी अभिनय केला. बोल्लींच्या अभिनयाला सुरवात झाली ती 'झासीकी राणी' ह्या प्रहसनातील राणीचा सरदार रावसाहेबांच्या भूमिकेपासून. शाळेच्या स्नेहसंमेलनात त्यांनी 'वर्डस्वर्थचे फुलपाखरू' ही दिवाकरांची नाट्यछटा सादर केली होती. तसेच 'आमचं ऐका', 'चैनीची चट' आदी नाटकांमध्ये भूमिका केल्या होत्या. लक्ष्मीनारायण बोल्लीं यांच्यातील अभिनेत्याला पुष्टी मिळाली ती बँकेच्या एकांकिका स्पर्धेतील 'पांडव प्रताप' एकांकिकेपासून. लक्ष्मीनारायण बँकेत नविनच होते.एकांकिका स्पर्धेसाठी बँकेतील कर्मचाऱ्यांनी 'पांडव प्रताप' ही एकांकिका बसवायला घेतली होती. नाटकाच्या तालमी सुरू झाल्या. बोल्ली दोन दिवस एका बाजूला बसून नाटकाची तालीम बघत होते. बोल्लीचा स्वभाव एकदम शांत होता.बोल्लींकडे पाहून कोणालाही वाटले नाही की ही व्यक्ती अभिनय करेल म्हणून कोणीही त्यांना विचारले नाही. भीमाच्या भूमिकेसाठी हवा तसा नट त्यांना मिळाला नव्हता. नट मिळेपर्यंत बोल्लींना भीमाचे संवाद वाचायला देऊन तालमीतील अडचण दूर करावी असे सर्वांनी ठरवले. बोल्लींना संवाद वाचायला दिले. बोल्लींनी संवाद इतके साभिनय वाचले की सर्वजण आश्चर्यचकित झाले. तेंव्हा नाटकातील एक सहकारी त्यांना म्हणाला, '' तुम्ही छान संवाद

वाचता, शब्दफेक उत्तम आहे. तुम्ही नाटकात काम करू शकता हे आधी का नाही सांगितलं''[२७] ' पांडव प्रताप' या नाटकापासून बोल्ली रंगमंचावर नट म्हणून अभिनय करू लागले. नाटकाला त्यांनी इतके वाहून घेतले की रात्रभर ते नाटकाच्या तालमींना जाऊ लागले. बोल्लींच्या या रात्रभर घराबाहेर राहण्याला आणि त्यांच्या नाटकाच्या तालमींना घरातील लोक वैतागले होते. 'पांडव प्रताप' ह्या नाटकाला सर्वोत्तम नाटिका, दिग्दर्शन आणि अभिनय अशी तीन पारितोषिके मिळाली. बोल्लींच्या मनाला वाटू लागले '' माझ्या व्यक्तिमत्त्वाभोवती लोकप्रियतेचं निदान बँकेपुरतं एक वलय वाट्याला आले.''[२८] म.गो.देशमुख लिखित 'देव नाही देव्हाऱ्यात' हे नाटक त्यांनी पुढील वर्षाच्या स्पर्धेत सादर केले. ह्या नाटकामध्ये बोल्लींनी बाबूराव गोखलेंची म्हणजेच दादासाहेबांची भूमिका केली. पद्मशाली शिक्षण संस्थेच्या मदतीसाठी बोल्लींनी या नाटकाचे अनेक प्रयोग केले.

मुंबईमध्ये १६ जानेवारी १९७४ रोजी लालबाग येथील स्पर्धेत बोल्लींनी 'काळे बेट लाल बत्ती' हे नाटक सादर केले. बोल्लींनी या नाटकामध्ये कम्युनिस्ट कामगार नेत्याची भूमिका केली. लालबाग या भागात बहुसंख्य कामगार वर्ग राहत होता. तसेच त्या दरम्यान त्याच विभागातून कम्युनिस्ट पार्टीकडून रोझा देशपांडे यांनी निवडणूक लढवली होती. या कारणामुळे बोल्लींच्या प्रत्येक संवादाला टाळ्यांचा कडकडाट होत होता. बोल्लींच्या या भूमिकेवर खूश होऊन शोभा कल्याणीने त्यांना स्वतःच्या वेणीतील गुलाबी फूल काढून दिले. बोल्लींनी हा गुलाबी पुरस्कार कितीतरी दिवस जपून ठेवला होता. अभिनय आणि नाटकाच्या वेडामुळेच लक्ष्मीनारायण व शोभाची मैत्री घट्ट होत गेली. एके दिवशी याच मैत्रीचे रूपांतर त्यांच्या लग्नात झाले.

लक्ष्मीनारायण आणि शोभा या दोघांनी अनेक नाटकात एकत्र काम केले. 'दिवा जळू दे सारी रात' या नाटकामध्ये दोघांनी आपल्या भूमिका योग्य रितीने वटवल्या. १९७५ साली 'अपराध मीच केला' नाटकामध्ये शोभाने शैला वर्टी आणि बोल्लींनी अशोक वर्टीची भूमिका वटवली. १९८४ साली राज्य नाट्य महोत्सवात बोल्लींनी 'चित्रलेखा' हे

नाटक सादर केले. या नाटकातील 'कुमारगिरी' च्या भूमिकेसाठी बोल्लींना उत्कृष्ट अभिनयाचा पुरस्कार मिळाला. १९८६ साली त्यांनी स्वतः लिहिलेले 'स्वीकार' हे नाटक सादर केले आणि रंगमंचाचा निरोप घेतला. निरोप घेताना बोल्ली रंगमंचावर मस्तक टेकवून मनातल्या मनात म्हणाले,'' आई ही माझी शेवटची भूमिका होती. यापुढे कलावंत म्हणून रंगमंचावर येणार नाही. या लेकराला तू अमाप किर्ती आणि उदंड आशीर्वाद दिला. त्याबद्दल मी तुझा ऋणी आहे.'' [२९] पुन्हा कधीही बोल्लींनी नट म्हणून काम केले नाही. स्वीकार ह्या नाटकानेच बोल्लींनी आपल्या अभिनय कारकीर्दीचा शेवट केला.

## १४) अनुवादक :

लक्ष्मीनारायण बोल्लींचा जन्म एका तेलुगू कुटूंबामध्ये झाला.बोल्लीच्या घरी सर्वजण तेलुगू भाषा बोलायचे. तसेच ते राहत असलेल्या साळीवाड्यादेखील सर्वजण तेलुगू भाषेतच बोलत असत. बोल्लींनादेखील शाळेत जाईपर्यंत मराठी भाषा म्हणावी तितकी येत नव्हती.पण बोल्ली शाळेत जाऊ लागले तेव्हापासून त्याचं मराठीशी नातं दृढ झालं. शाळेत असताना बोल्ली कधी कधी हिंदी, मराठी गाण्यांचे तेलगुमध्ये रूपांतर करून गाणी म्हणायचे बोल्लींच्या या प्रवृत्तीतूनच पुढे ते तेलुगू मराठीचे मोठे अनुवादक बनले. बोल्लींनी अनुवादकाचं रूप धारण केलं ते वयाच्या चौदाव्या वर्षी 'प्यासा' या हिंदी चित्रपटातील चंपीमालीश' गाण्यापासून. ते गाण असं होतं, '' सर जो तेरा चकराये, या दिल डुबा जाये आजा प्यारे पास हमारे, काहे घबराये... काहे घबराये... '' [३०] याचा तेलगुमध्ये अनुवाद केला.'' तलाभारमैना, लेका मनुसू दिगुलपडुतअुना रा रा नाना ना सन्निधिकी येंदुकु भयपडतौ... येंदुकु भयपडतौ... '' [३१] असे गाण्यांचं तेलगुमध्ये रूपांतर करता करता पुढे बोल्लींनी तेलुगू-मराठी साहित्याचा अनुवाद करण्यास सुरवात केली. तेलुगू संतकवी वेमनाच्या वचन शतकाचा बोल्लींनी मराठीमध्ये अनुवाद केला. ही वचने 'अभंग कलश' नावाच्या पुस्तकरूपाने प्रकाशित झाली. बोल्ली एका कार्यक्रमाच्या निमित्ताने हैद्राबादला

गेले होते. तेथे त्यांची भेट तेलुगू विद्यापीठातील तेलुगू भाषेत प्रवीण असणारे डॉ. बुधराजु राधाकृष्ण यांच्याशी झाली. डॉ. राधाकृष्ण हे पालकुर्की सोमनाथांच्या 'पंडिताराध्य चरित्र' या ग्रंथावर संशोधन करीत होते. या ग्रंथातील तेलुगू लिपीतील परंतु मराठी भाषेतून असलेल्या बावीस ओळींचा अर्थ त्यांना समजत नव्हता. अनेकांना त्यांनी या ओळींचा अर्थ विचारला होता. पण कोणीही त्यांना त्याचा अर्थ सांगू शकले नाहीत. डॉ. राधाकृष्ण यांनी त्या ओळी बोल्लींना दाखवल्या. बोल्लींनी त्या बावीस ओळींचा तेलगुमध्ये अनुवाद करून दिला. बोल्लींमुळे डॉ. राधाकृष्ण यांच्या संशोधनात बरीच वर्षे निर्माण झालेली अडचण दूर झाली.

गो.मा.पवार हे दिल्लीच्या साहित्य अकादमीचे सदस्य होते. तेलुगू मराठीचा अनुवाद करणाऱ्या अनुवादकाची त्यांना आवश्यकता होती. लक्ष्मीनारायण बोल्ली गो.मा.पवारांच्या चांगल्या परिचयाचे होते. पवारांना बोल्लींच्या तेलुगू मराठीच्या अभ्यासाविषयी माहिती होती. तेलुगू साहित्यिक त्रिपुरनेनि गोपीचंद यांच्या 'पंडित परमेश्वरशास्त्री विलुनामा' या कादंबरीला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला होता. मराठीमध्ये अनुवाद करण्यासाठी ही कांदबरी पवारांनी बोल्लींकडे पाठवली. काही दिवसांच्या अथक परिश्रमाने चारशे पानांची ती कादंबरी बोल्लींनी अनुवाद करून पाठवली.'एका पंडिताचे मृत्यूपत्र' या शीर्षकाने ती कादंबरी साहित्य अकादमीकडून प्रकाशित झाली. अशीच बोल्लींची 'पंचपदी', 'रात्र एका होडीतली' ही अनुवादित पुस्तके प्रकाशित झाली आहेत. तसेच बोल्लींनी अनेक तेलुगू कथांचा मराठीमध्ये अनुवाद केला आहे.

१९९६ मध्ये बोल्लींची तेलगुभाषा अभिवृद्धी संघम आणि महाराष्ट्र राज्य मराठी विकास संस्था, मुंबई यांच्यावतीने दोन दिवसांचे चर्चासत्र आयोजित केले होते. या चर्चाचत्रामध्ये चर्चेसाठी 'तेलगु मराठी संत साहित्य', 'तेलगु मराठी लोकसाहित्य', 'तेलुगू मराठी सांस्कृतिक अनुबंध' हे विषय देण्यात आले होते. या चर्चासत्रामध्ये तेलगु आणि

मराठीतील प्रत्येकी २२ साहित्यिक सहभागी झाले होते. दोन दिवसांच्या या चर्चासत्रामध्ये मराठी निबंध वाचताना तेलगुमध्ये तर तेलुगू निबंध वाचताना मराठीमध्ये अनुवाद करण्याचे काम बोल्लींनी सहजपणे पार पाडले. म्हणून '' तेलगु आणि मराठी या दोन भाषा वाहिनींना भाषाभगिनींना जोडणारा सप्तरंगी पूल म्हणजे लक्ष्मीनारायण बोल्ली असचं गौरवानं व सार्थतेनं म्हणता येतं.'' [३२]

## १५) संशोधक :

लक्ष्मीनारायण बोल्लींनी तेलुगू-मराठी साहित्यातील अनुवादाबरोबरच संशोधनाचेही कार्य केले. अनेक बाबतीत मराठी आणि तेलुगू भाषेतील साम्यस्थळांचा शोध त्यांनी घेतला आहे. तेलुगू-मराठीवर आधारित अनेक शोधनिबंधही त्यांनी सादर केले. ऑगस्ट १९८९ मध्ये मुंबई येथे पहिली जागतिक मराठी परिषद भरली होती. परिषदेच्या शेवटच्या दिवशी कन्नड, गुजराती, बंगाली, मल्याळी, तामिळ, तेलुगू या भाषांशी मराठीचा असणारा अनुबंध या विषयावर मुलाखती होणार होत्या. मराठीतील साहित्यिक पु.ल.देशपांडे हया मुलाखती घेणार होते. तेलुगू मराठीच्या अनुबंधाविषयी मुलाखतीसाठी पु.ल.देशपांडेनी बोल्लींना आमंत्रित केले होते. बोल्लींनी अहोरात्र संशोधन करून तेलुगू-मराठीविषयी भाषा, लिपी, संस्कृती, लोककथा, लोकगीते, लोक कलावंत, संत साहित्य इत्यादी बाबतीत तौलानिक माहिती गोळा केली. मुलाखतीद्वारे ही सर्व माहिती बोल्लींनी अगदी संक्षेपाने सादर केली.

लक्ष्मीनारायण बोल्ली 'आंध्रप्रभा' या वृत्तपत्राच्या ७५ व्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमासाठी आंध्रप्रदेशला गेले होते.या कार्यक्रमामध्ये तिरूमला रामचंद्रावु यांना महाराष्ट्री प्राकृत भाषेचा अभ्यास करून त्यातून चाळीस तेलुगू शब्द शोधल्याबद्दल डॉक्टरेट पदवी देण्यात आली. कार्यक्रमांतर्गत ज्ञानेश्वरांबद्दल बोलताना अनेकजण पैठणाचा उल्लेख 'पायठाण' असा करीत होते. पायठाणचा उल्लेख पुढे पायताण होईल

म्हणून बोल्लींनी त्याकडे सर्वांचे लक्ष वेधले आणि म्हणाले,“ तुमच्या उच्चार दोषाचा परिणाम पुढच्या पिढीला विकृत अर्थाकडे नेईल” [३३] एवढेच बोलून ते गप्प बसले नाहीत. रामचंद्रावु यांच्याशी याबाबतीत सविस्तर चर्चा करण्यासाठी ते त्यांच्या घरी गेले. चर्चा झाल्यानंतर रामचंद्रावुंनी ज्या गाथा सप्तशतीमधील श्लोकातून चाळीस शब्द शोधून काढले होते त्याची झेरॉक्स प्रत बोल्लींना दिली. बोल्लींनी त्या श्लोकांचा अभ्यास करून त्यातून ऐंशी(८०) मराठी शब्दांचा शोध घेतला. हे शब्द दुसऱ्या दिवशी बोल्लींनी रामचंद्रावुंना दाखविले तेंव्हा ते बोल्लींना म्हणाले “ तुम्ही डबल डॉक्टरेटचं काम केलं”.[३४] तसेच २००२ मध्ये वरंगल येथील काकतीय विद्यापीठात झालेल्या चर्चासत्रामध्ये ‘तेलगुसंत पोतनावरील श्री. ज्ञानदेवाचा प्रभाव’ हा शोधनिबंध बोल्लींनी सादर केला. निबंधामध्ये बोल्लींनी पोतना आणि ज्ञानेश्वरांच्या साहित्यातील अभिव्यक्तीची भाषा, नम्रता, दृष्टांत देण्याची पद्धत, शब्दकळा, उपमा यातील साम्यस्थळांचा सूक्ष्म पद्धतीने आढावा घेतला.

## १६) परीक्षक :

लक्ष्मीनारायण बोल्ली तेलुगू भाषिक असले तरी मराठी भाषेवर त्यांचे प्रचंड प्रभुत्व होते. तेलुगू भाषेबरोबरच त्यांचे मराठी भाषेवर खूप प्रेम होते. बोल्लींनी मराठी साहित्यातील कथा, कविता, नाटक असे अनेक प्रकार हाताळले. बोल्लीची मराठी साहित्यातील कामगिरी पाहून ‘महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट मराठी लेखन पुरस्कार समितीवर परीक्षक सदस्य म्हणून म्हणून निवड करण्यात आली. समितीचे अध्यक्ष व.दि. कुलकर्णी होते. तसेच या समितीमध्ये ना.धो.महानोर, पी.सावळाराम, शैलजा राजे, बाळ सामंत, दया पवार इत्यादी अन्य परीक्षक सदस्य होते. सुमारे ४०० पुस्तके बोल्लींना परीक्षणासाठी देण्यात आली. सर्व पुस्तकांचे परीक्षण करून, बोल्लींनी त्यातील पाच पुस्तकांची निवड केली.बोल्लींनी निवडलेल्या पाचही पुस्तकांना अन्य परीक्षक सदस्यांनी संमती दर्शविली. पाच पुस्तकामधून पुन्हा सर्वश्रेष्ठ अशा एका पुस्तकाची निवड करायची होती. बोल्लींनी

सुधाकर गायधनी यांच्या 'देवदूत' या पुस्तकाची निवड केली. बोल्लींच्या निवडीबाबत अन्य सदस्यांनी उलट सुलट चर्चा केली. पण शेवटी 'देवदूत' या पुस्तकाचीच निवड करण्यात आली. तसेच बोल्ली उत्कृष्ट मराठी लेखनासाठी पुरस्कार दिले जाणाऱ्या 'भैरूरतन दमाणी साहित्य पुरस्कार' समितीचेही परीक्षक सदस्य होते. बोल्ली या समितीचे परीक्षक सदस्य असल्यामुळे त्यांना सुरेश भट, मंगेश पाडगावकर, विजय तेंडुलकर, वसंत कानेटकर, मधु मंगेश कर्णिक, डॉ.यू.म.पठाण, माधवी देसाई, मारूती चित्तमपल्ली, नारायण सुर्वे, व्यंकटेश माडगूळकर, अनिल बर्वे, वसंत बापट, शिवाजी सावंत, बा.भ.बोरकर, वसंत आबाजी डहाके, पु.ल.देशपांडे इत्यादी साहित्यिकांसोबत परीक्षक म्हणून काम करण्याचे भाग्य लाभले.

**१७) संपादक :**

तेलगुतले प्रख्यात कवी डॉ.सी.नारायण रेड्डी हे बोल्लींच्या चांगल्या परिचयाचे होते. अनेक कार्यक्रमांच्या निमित्ताने वारंवार त्यांच्या भेटी होत असत. बोल्लीं 'झुंबर' या काव्यसंग्रहाच्या प्रकाशनाचे आमंत्रण त्यांना देण्यासाठी मद्रासला गेले. मद्रासमध्ये बोल्लीची तेलुगू चित्रपट सृष्टीतील प्रख्यात नट एन.टी.रामाराव आणि प्रख्यात निर्माते विजया बापीनाडु यांच्याशी भेट झाली. विजया बापीनाडु हे तेलुगू मासिक 'बोम्मारिल्लु' याचे संपादक होते. बापीनाडूंना हे मासिक सर्व भारतीय भाषांतून काढायचे होते. या मासिकाच्या मराठी विभागाचे संपादक होण्याची विनंती बापीनाडूंनी बोल्लींना केली. २२ मार्च १९८८ रोजी बोल्लींनी संपादक पदाचा स्वीकार केला. बोल्लींनी मासिकाच्या मराठी आवृत्तीसाठी 'गुलमोहर' हे शीर्षक निश्चित केले आणि त्या मासिकाचे संपादन करण्याचे काम केले.

महाराष्ट्रामध्ये अनेक तेलुगू शाळा होत्या. या शाळांतील पहिली ते दहावीची पुस्तके महाराष्ट्र राज्याच्या अभ्यासक्रमानुसार मिळत नव्हती. सर्व पुस्तके आंध्रप्रदेशातून

आणावी लागत असत. त्यामुळे विद्यार्थ्यांना महाराष्ट्राचा इतिहास, भूगोल समजतच नव्हता. पुस्तकात सर्व माहिती आंध्रप्रदेशच्या अभ्यासक्रमानुसार होती. या कारणाने मराठी पहिली ते दहावीची पुस्तके जशीच्या तशी तेलुगूमध्ये आणण्याची गरज होती. तेंव्हा बोल्लींना बालभारतीच्या तेलुगू पाठ्यपुस्तक समितीचे अध्यक्ष होण्याची विनंती बालभारतीचे संचालक डॉ.वसंत काळपांडेंनी केली. बोल्लींनी अध्यक्ष पदाचा स्विकार केला आणि आपल्या तेलुगू सहकाऱ्यांच्या मदतीने पहिली ते दहावीपर्यंतची पुस्तके तयार करून दिली.

## १८) कवी :

लक्ष्मीनारायण बोल्ली हे दिग्दर्शक, नाटककार, अभिनेता अनुवादक, कथाकार होते. पण खरे म्हणजे त्यांचा पिंड होता तो कवीचा लक्ष्मीनारायण बोल्लींच्या साहित्यक्षेत्राची सुरूवात झाली ती कवितेपासून. बोल्ली ओळखले जायचे ते कवी लक्ष्मीनारायण बोल्ली म्हणून. बोल्लींच्या कवितेला सुरवात झाली ती भारत चीन युद्ध काळात. बोल्लींच्या कानावर अनेक समरगीतं पडत होती. यातूनच त्यांना एक समर गीत सुचले. बोल्लींनी ते गीत जटला मास्तरांकडे दिले. जटला मास्तरांनी ते गीत कामगार कल्याण केंद्राच्या 'कल्याण शलाका' या मासिकाकडे पाठवले. दोन महिन्यांच्या कालावधीनंतर ते गीत छापून आले तेंव्हा जटला मास्तर बोल्लींना म्हणाले,'' तू आता लेखकच नाही तर कवीही झालास.'' [३५] पण त्यानंतर बोल्लींना कविता करता आल्या नाहीत.

लक्ष्मीनारायण बोल्लींच्या काव्य कारकीर्दीला सुरूवात झाली ती १९७१ साली. प्रदर्शित झालेल्या 'हरे रामा हरे कृष्णा' या चित्रपटापासून. या चित्रपटातील हरे रामा हरे कृष्णा म्हणत शुद्ध हरपून कोसळणारे हिप्पी तरूण आणि ३० जानेवारी १९४८ रोजी ' हे राम' म्हणून कोसळलेले गांधीजी या धर्तीवर बोल्लींना एक कविता सुचली

“ पंचवीस वर्षापूर्वीची ....

तीस जानेवारी

अर्ध नग्न देहाचे,

एक महात्मा

प्रार्थनेच्या वाटेवर,

रक्ताच्या थारोळ्यात,

उसासे सोडीत...

पुटपुटला...

हरे रा... म ! हरे रा... म !!

आज त्याच मातीतले

अर्धनग्न (!) देहाचे,

‘हिप्पी’ आत्मे...

अनाचाराच्या वाटेवर, गांजा-अफुचे, दमादम मारीत...

शुद्ध हरपून बरळत आहेत, हरे रा... मा ! हरे कृ... ष्णा !! ” [३६]

लक्ष्मीनारायण बोल्लींची ही पहिली कविता त्यांनी सोलापूर समाचार, संचार आणि पुण्याचा सकाळ या वृत्तपत्रांकडे पाठवली. ३० जानेवारीला सोलापूर समाचारच्या शेवटच्या पानावर ती कविता छापून आली. दोन दिवसानंतर तीच कविता सकाळच्या पहिल्या पानावर छापून आली. तसेच सकाळचे संपादक मुणगेकर यांनी कविता आवडल्याचे आणि वृत्तपत्राचे संकेत मोडून कविता पहिल्या पानावर छापल्याचे बोल्लींना पत्राने कळवले. याच दरम्यान रवींद्र भटांची ‘इंद्रायणी काठी’ ही कादंबरी त्यांच्या वाचनात आली. कादंबरीतील ज्ञानेश्वरांच्या जीवनदर्शनाने बोल्ली भारावून गेले. ताबडतोब आळंदीला जाऊन त्यांनी ज्ञानेश्वरांच्या समाधीचे दर्शन घेतले. तेव्हा बोल्लींना नवीन कविता सुचली आणि त्यांना वाटू लागले,“ आठ-दहा पानी कथा लिहिण्यापेक्षा आठ-दहा ओळींची कवितादेखील

तेवढाच परिणाम साधू शकते.'' [३७] ही कविता पुण्याच्या 'स्वराज्य' साप्ताहिकातून छापून आली. ह्या कवितेपासूनच बोल्ली खऱ्या अर्थाने कवी झाले.

लक्ष्मीनारायण बोल्लींनी कविता लिहिण्याचा सपाटाच लावला. अनेक कविता त्यांच्याकडून लिहून झाल्या. या कवितांतील चाळीस कविता बोल्लींनी निवडल्या आणि 'मैफल' शीर्षकाने कवितासंग्रह प्रकाशित करण्याचे ठरवले. 'मैफल' कवितासंग्रहाला बा.भ.बोरकरांची प्रस्तावना लाभावी अशी बोल्लींची इच्छा होती. बोल्लींच्या या इच्छेमागे एक मोठे कारण होते. एके दिवशी बोल्लींच्या आईचे वडील म्हणजे त्यांचे आजोबा व्यंकय्या पोतन यांचे निधन झाले. अंत्ययात्रेसोबत लक्ष्मीनारायण स्मशानभूमीत गेले. स्मशानभूमीत गेल्यानंतर जोरदार पाऊस सुरू झाला. बोल्ली एका झाडाखाली जाऊन उभे राहिले. झाडाखाली असणाऱ्या समाधीवरील ओळी ते वाचू लागले.

'' परि जयाच्या दफनभूमीवर
नाही चिरा, नाही पणती
तेथे कर माझे जुळती... '' [३८]

या ओळी वाचल्यानंतर बोल्ली सुसाट वेगाने घरी पळाले. घरात येऊन त्यांनी मराठीचे पुस्तक काढले आणि कविता शोधू लागले. कविता त्यांना सापडली, ती बोरकरांची कविता होती. हे त्यांच्या लक्षात आले. कवितेच्या नादात त्यांना आपले आजोबा वारल्याचे भानच नव्हते. बोल्ली भानावर आले आणि पुन्हा स्मशानभूमीकडे पळाले. तेंव्हा बोल्ली आपल्या कवितेच्या जाणीवेबद्दल म्हणतात,''एवढं खरं माझ्या आयुष्यात कवितेची पहिली जाण मला स्मशानभूमीतच आली. पुढे या जाणिवेपोटीच कविता कळो न कळो बोरकरांची कविता दिसली की ती मी आवर्जुन वाचू लागलो.'' ३९ बोरकरांमुळेच बोल्लींना कवितेची जाण आली आणि ते कवी झाले, म्हणून बोल्लींना त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहाला बोरकरांचीच प्रस्तावना हवी होती. बोल्लींनी प्रस्तावनेबाबत बोरकरांना पत्राने कळवले. बोरकरांनी बोल्लीच्या कवितासंग्रहासाठी प्रस्तावना लिहिली आणि

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

प्रकाशनासाठी ते सपत्नीक हजर झाले. तेंव्हा शांतिलाल भंडारी म्हणतात, "मराठी साहित्य क्षेत्रातलं विशेषतः काव्य प्रांगणातले लक्ष्मीनारायण बोल्ली याचं कर्तृत्व मोठमोठ्या साहित्यिकांनीही मान्य केलेले आहे, म्हणून बा.भ.बोरकरांसारखा दिग्गज कवी पुण्याचा एक महत्त्वाचा कार्यक्रम पुढे ढकलून लक्ष्मीनारायण बोल्ली यांच्या 'मैफल' या काव्यसंग्रहाचं मोठ्या कोडकौतुकानं प्रकाशन करू शकतो."[४०]

१९८२ साली बोल्लींचा दुसरा काव्यसंग्रह 'झुंबर' प्रकाशित झाला. श्रेष्ठ कवी कुसुमाग्रजांची प्रस्तावना ह्या कविता संग्रहाला लाभली. 'झुंबर' या कविता संग्रहाच्या सोहळ्यासाठी बोरकर, वसंत बापट, तेलुगू कवी डॉ. सी.नारायण रेड्डी आणि पु.ल.देशपांडे सपत्नीक हजर झाले होते. प्रकाशन सोहळ्यानंतर तीन दिवस या मंडळींनी बोल्लींच्या घरी राहून काव्य मैफिली रंगवल्या. कुसुमाग्रजांना जेंव्हा ज्ञानपीठ पुरस्कार जाहीर झाला तेंव्हा पुरस्कार सोहळ्यासाठी हजर राहण्यासाठी त्यांनी बोल्लींना पत्राद्वारे कळवले. १९९६ साली बोल्लींचा 'सावली' हा कविता संग्रह प्रकाशित झाला. तसेच 'लक्ष्मीनारायण बोल्लींची कविता' हा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला.

लक्ष्मीनारायण बोल्लींना कविता करण्याबाबत त्यांच्या घरातून विरोध होता. कवितेपासून परावृत्त करण्यासाठी बोल्लींवर वारंवार दबाव आणला जात होता. पण बोल्लींनी कवितेची साथ सोडली नाही. बोल्लींना हृदय विकाराचा झटका आला तेंव्हा डॉक्टरांनी त्यांना चार महिन्यांपेक्षा जास्त काळ ते जगणार नसल्याचे सांगितले. अशा अवस्थेतही त्यांच्या पत्नीकडून त्यांचा छळ सुरू होता. ही गोष्ट डॉक्टरांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी बोल्लींना स्थलांतराचा सल्ला दिला. बोल्लींच्या ठिकाणी दुसरं कोणी असतं तर कोणत्या तरी प्रेक्षणीय स्थळी गेले असते. पण कवी मनाच्या बोल्लींनी तेलंगणातील सिरसिल्ला या गावी जाण्याचे ठरवले. कारण या गावी तरूणांचं एक कवी मंडळ होतं. कवी मंडळातील कवींचा बोल्लींवर खूप जीव होता. सिरसिल्ला गावाशेजारील वेमुलवाडा या गावी बरेच तेलुगू कवी, पंडित राहत होते. बोल्लींनी ह्या सर्व

कवी मंडळींच्या सहवासात आपल्या आयुष्यातील शेवटचे क्षण घालवण्याचे ठरवले. चार महिन्यांचे आयुष्य उरलेले बोल्ली त्यांच्या काव्य सहवासामुळे आजतागायत जीवित आहेत. कवितेनेच बोल्लींना नावारूपास आणलं आणि कवितेनेच त्यांना तारलं असचं म्हणावं लागेल.

## १९) लक्ष्मीनारायण बोल्ली आणि त्यांचे समकालीन लेखक :

१९६० नंतर मराठी साहित्य अनेक बाजूंनी उजळून निघाले. मराठी साहित्यात दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य इत्यादी अनेक नवे प्रवाह निर्माण झाले. या काळामध्ये अनेक लेखक, कवी, नाटककार उदयास आले. लक्ष्मीनारायण बोल्लीदेखील १९६० नंतरच लेखनाकडे वळलेले दिसतात. द.ता. भोसले, योगीराज वाघमारे, भास्कर चंदनशिव हे सर्व बोल्लींचे समकालीन लेखक आहेत. एक साहित्यिक म्हणून बोल्लींकडे पाहताना या समकालीन लेखकांचा विचार करणे महत्त्वाचे आहे.

द.ता. भोसले हे एक ग्रामीण कथाकार म्हणून ओळखले जातात. भोसलेंचे 'पार आणि शिवार', 'अग अग म्हशी' हे कथासंग्रह पाहता त्यांच्या ग्रामीण कथांची जाणीव होते. भोसलेंच्या कथेचा मुख्य विषय ग्रामीण जीवन आणि त्याच्याबरोबर चित्रित होणारी ग्रामीण व्यक्तिमत्व हा आहे. भोसलेंनी कथांतून शेतकऱ्याचे आपल्या काळीवर (शेतावर) आणि पांढरीवर (गावावर) असणारे प्रेम प्रकर्षाने मांडले आहे. ग्रामीण जीवनातील दु:ख, भोगाचे चित्रण, दारिद्रय, स्त्रियांवरील अन्याय त्यांनी आपल्या कथांतून चित्रित केले आहे. ग्रामीण भागातील होणाऱ्या सुधारणा राजकारण याचा तेथील जीवनावर होणारा परिणाम भोसलेंनी चित्रित करण्याचे काम केले आहे.

योगीराज वाघमारे हे दलित कथाकार म्हणून उदयास आले. त्यांचे 'उद्रेक' (१९७८), 'बेगड' (१९८०), 'गुडदाणी' (१९८३) हे कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. योगीराज वाघमारेंच्या कथेचा मुख्य विषय दलित जीवन हा आहे. वाघमारेंनी ते ज्या

भागात जन्मले, वाढले, जगले त्या भागाचे चित्रण आपल्या कथांतून केले आहे. वाघमारेंनी त्यांच्या कथेद्वारे दलितांचे अंतर्गत ताणतणाव, त्यांचे दु:ख, त्यांच्यावर होणारे अन्याय, अत्याचार, त्यांच्या वेदना जगासमोर आणल्या. आंबेडकरी तत्त्वज्ञानाने उजळून निघालेले तरूण तसंच शिक्षित तरूणांना वाटणारी आपल्या आई, वडील, समाजाची लाज इत्यादी त्यांनी अगदी परखडपणे आपल्या कथेतून मांडले आहे. योगीराज वाघमारेंच्या कथेने दलित विकास आणि समृध्दीचा वाटा उचलला आहे. दलित कथा वाङ्मयात योगीराज वाघमारे यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

भास्कर चंदनशिव हे एक दलित आणि ग्रामीण यांच्या सीमारेषेवरील कथाकार आहेत. चंदनशिव यांचे 'जांभळढव्ह' (१९८०), 'मरणकळा' (१९८३), 'अंगारमाती' (१९९१), 'नवीवारूळ' (१९९२) हे कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. चंदनशिव यांनी मराठवाड्यातील बीड, उस्मानाबाद जिल्ह्यातील परिसराचे चित्रण आपल्या कथातून केले आहे. यामुळे त्या भागाचे एक वेगळेपण जगासमोर येते. ग्रामीण आणि दलित जीवनातील सूक्ष्म बारकावे त्यांच्या कथेने टिपल्याचे दिसून येते. चंदनशिव यांनी दलित आणि ग्रामीण जीवनाची सांगड घातली आहे.

लक्ष्मीनारायण बोल्ली हे एक तेलुगू भाषिक आहेत. द.ता. भोसले, योगीराज वाघमारे, भास्कर चंदनशिव हे मराठी भाषिक आहेत. बोल्लींच्या या समकालीन लेखकांनी मराठीतून लेखन करणे यात आश्चर्य म्हणता काहीच नाही. पण लक्ष्मीनारायण बोल्लींना शाळेमध्ये पास होण्यापुरती मराठी येत असताना पुढील काळात त्यांनी मराठी भाषा अवगत केली. फक्त अवगतच केली नाही तर मराठी भाषेची सेवा त्यांच्याकडून घडली. बोल्लींचे समकालीन लेखक फक्त कथा या वाङ्मय प्रकारात रममाण झाल्याचे दिसून येते. पण तेलुगू भाषिक बोल्लींनी कथेबरोबरच काव्य, नाट्य, अभिनय, दिग्दर्शन या क्षेत्रात उंच भरारी मारली. बोल्लींचे 'मैफल' (१९७८), 'झुंबर' (१९८२), 'सावली' (१९९६), हे कविता संग्रह प्रकाशित झाले आहेत. तसेच 'गवाक्ष' हा ललित लेखसंग्रह, 'गीत मार्कंडेय'

(१९९८) हा गीतसंग्रह, 'विरहणी वासवदत्ता' (१९९६) हे नाटक इ. साहित्य प्रकाशित झाले आहे. बोल्लींनी अनुवादातही भरघोस काम केले आहे. त्यांनी तेलुगूतील साहित्य मराठीमध्ये अनुवादित केले आहे. यामध्ये 'अभंग कलश' (१९८८), 'पंचपदी', 'रात्र एका होडीतली' (२००२), 'एका पंडिताचे मृत्यूपत्र' १९९६ इत्यादी ग्रंथांचा समावेश होतो. तसेच तेलुगू आणि मराठीची तुलना करणारा 'तेलुगू फुलांचा मराठी सुगंधे' हा अभ्यासग्रंथ लिहिला आहे. बोल्लींच्या समकालीन लेखकांचा विचार करता बोल्लींचे व्यक्तिमत्व बहुरंगी आहे. समकालीन लेखकांनी कथा लेखनाचाच प्रयत्न केला पण बोल्लींनी मात्र अनेक वाङ्मयप्रकारांमध्ये चौफेर लेखन केले आहे. मराठी साहित्याच्या बाबतीत बोल्ली हे त्यांच्या समकालीन लेखकांच्या मानाने श्रेष्ठ ठरतात. बोल्लींनी मराठी आणि तेलुगू साहित्यामध्ये मोलाची भर घातली आहे.

**निष्कर्ष :**

प्रस्तुत प्रकरणामध्ये 'एका साळियाने' या आत्मचरित्रातील लक्ष्मीनारायण बोल्ली यांची जडण घडण कशी झाली याचा वेध घेतला आहे. लक्ष्मीनारायण बोल्ली एक व्यक्ती म्हणून कसे होते याचा आढावा घेतला आहे. तसेच बोल्लींच्या व्यक्तिमत्वातील विविध अंगांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. लक्ष्मीनारायण बोल्ली यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करता काही निष्कर्ष हाती येतात ते पुढीलप्रमाणे पाहता येतील.

लक्ष्मीनारायण बोल्ली हे सत्याचा स्वीकार करणारे आहेत. बोल्लींनी ते स्वत: दिसायला कुरूप होते हे मान्य केले आहे. बोल्ली इतके भित्रे होते की एक मुलगी त्यांच्याकडे पाहून गाणं म्हणते म्हणून ते आपला रस्ता बदलतात. बोल्लींच्या जागी दुसरं कोणी असतं तर त्यानेही गाणं म्हटले असते. पण बोल्लींचा स्वभाव कोणत्याही गोष्टीत घाबरण्याचा असल्यामुळे ते त्या मुलगीला प्रतिसाद देऊ शकले नाहीत. बोल्लीं नेहमी कमीपणा स्वीकारणारे आहेत. नकारात्मक विचार करून अनेक गोष्टींपासून स्वत: दूर

राहणारे आहेत. बोल्लींनी कधीही कोणत्या गोष्टीसाठी हट्ट केला नाही किंवा कोणत्या गोष्टीवर आपला हक्क गाजवण्याचा प्रयत्न केला नाही. बोल्ली एकदम शांत आणि सरळमार्गी असे व्यक्तिमत्व आहे. बोल्ली घरातील लहान मोठ्या व्यक्तींकडून अनेकवेळा अपमानित झाले, पण कधी कोणाला त्यांनी उलट उत्तर देण्याचा प्रयत्न केला नाही. घरामध्ये त्यांना सर्वजण हिडीसफिडीस करत असताना कोणाबाबतही कोणतीच तक्रार त्यांनी करण्याचा प्रयत्न कधी केला नाही. चित्रकला असो किंवा व्यवसाय असो यामध्ये यश मिळत असताना केवळ वडीलांची आज्ञा म्हणून ते सर्व सोडण्यास तयार होणारे आहेत. बोल्ली स्वतः दुःख सहन करतील पण कोणाचे मन दुःखावेल असे बोलणार नाहीत. आपली कर्तव्ये जाणून ती पार पाडणारे बोल्ली बावळट गणले गेले. पण सगळ्या जगाचं शहाणपणं त्यांच्याकडे आहे. स्वतःपेक्षा इतरांचा जास्त विचार ते करतात. बोल्ली हे पैसा मिळवण्याचे अनेक प्रसंग येऊनसुध्दा स्वार्थ साधणारे नाहीत. तसेच आपले वडील, भाऊ यांच्या राजकीय पाठबळाचा कधीही वापर करणारे नाहीत. बोल्ली इतक्या हळव्या मनाचे आहेत की ते स्वतःचा प्राण त्यागण्यास तयार होतील. बोल्ली हे एक चांगले मित्र आहेत. प्रायोगिक रंगभूमीवर काम करणारा हा अभिनेता, दिग्दर्शक, नाटककार व्यावसायिक रंगभूमीकडे कधी वळला नाही. बोल्ली हे मराठी साहित्य आणि मराठी साहित्यिकांचा आदर करणारे आहेत. लक्ष्मीनारायण बोल्ली हे कविता, कथा, नाटक, गीत, अनुवाद अशा अनेक बाजू पेलणारं व्यक्तिमत्त्व आहे. एकाच वेळी कथाकार, कवी, नाटककार, दिग्ददर्शक, अभिनेता, गीतकार असणारे लक्ष्मीनारायण बोल्ली हे मराठी साहित्यातील एकमेवाद्वीतीय व्यक्तिमत्त्व आहे असेच म्हणता येईल.

# संदर्भग्रंथ सूची


१. बोल्ली लक्ष्मीनारायण : 'एका साळियाने' पद्मगंधा प्रकाशन ३६/११, धन्वंतरी सह. गृह संस्था, पांडुरंग कॉलनी, एरंडवन, पुणे, पृ.क्र. ७१.

२. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव, पृ.क्र. ७१

३. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव, पृ.क्र. ८१

४. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव, पृ.क्र. ८२

५. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव, पृ.क्र. ९१

६. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव, पृ.क्र. ९१

७. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव, पृ.क्र. १२१

८. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव, पृ.क्र. ११४

९. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव, पृ.क्र. ११५

१०. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव, पृ.क्र. १२०

११. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव, पृ.क्र. ११६

१२. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव, पृ.क्र. ९८

१३. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव, पृ.क्र. ७६

१४. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव, पृ.क्र. ७६

१५. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव, पृ.क्र. २३३

१६. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव, पृ.क्र. २६३

१७. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव, पृ.क्र. १०९

१८. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव, पृ.क्र. २६४

१९. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव, पृ.क्र. ८४

२०. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव, पृ.क्र. १६५

२१. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव, पृ.क्र. १६५

२२. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव, पृ.क्र. २४१

२३. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव, पृ.क्र. १६४

२४. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव, पृ.क्र. २५५

२५. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव, पृ.क्र. २२४

२६. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव, पृ.क्र. २२४

२७. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव, पृ.क्र. १३७

२८. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव, पृ.क्र. १३७

२९. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव, पृ.क्र. २२८

३०. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव, पृ.क्र. ११९

३१. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव, पृ.क्र. ११९

३२. भंडारी शांतिलाल : 'एका साळियाने काढला तेलगू साडीवर मराठी कशिदा', 'साहित्य, २१, नवीवाडी, दादीशेट अग्यारी लेन, मुंबई २, पृ.क्र. ३२.

३३. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव, पृ.क्र. २४८

३४. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव, पृ.क्र. २४८

३५. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव, पृ.क्र. १३५

३६. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव, पृ.क्र. १४९

३७. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव, पृ.क्र. १५०

३८. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव, पृ.क्र. ९१

३९. बोल्ली लक्ष्मीनारायण : तत्रैव, पृ.क्र. ९१, ९२

४०. भंडारी शांतिलाल : 'एका साळियाने काढला तेलगू साडीवर मराठी कशिदा', 'साहित्य', २१, नवीवाडी, दादीशेट अग्यारी लेन, मुंबई २, पृ.क्र. ३३.

४१. शहा सुरेखा : 'अनेकरंगी भावभावनांनी विणलेले महावस्त्र', 'सप्तरंग', सकाळ, १६ सप्टें. २००७.